७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## टिपू सुलतानची तुलना शिवरायांशी करणे ही जिहादी मानसिकता

मुंबई (दै. संध्या) : टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करणे ही जिहादी मानसिकता दर्शवते. टिपूने लाखो हिंदूंना धर्मांतर केले, मंदिरे नष्ट केली आणि केवळ इस्लाम प्रसारावर लक्ष केंद्रित केले. तो आमच्या शिवरायांच्या पायाशीही येऊ शकत नाही, असे म्हणत मंत्री नीतेश राणे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या टिपू सुलतानबाबतच्या वादग्रस्त विधानावर टीका केली आहे. नीतेश राणेंनी पुढे म्हटले आहे की, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी आपल्या कार्यालयात शिवरायांचे फोटो काढून फक्त टिपूचे लावले तर बघू, महाराष्ट्रातील मावळे त्यांना कसे परवानगी देतात. हर हर महादेव! असे म्हटले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानचे शौर्य छत्रपती शिवाजी महाराजांसारखेच आहे, असे वक्तव्य केल्याने नवा वाद सुरू झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य ज्या पद्धतीचं आहे त्यांचा आदर्श घेऊन टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता आणि त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे भारताचे भूमिपुत्र होऊन गेले.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### हर्षवर्धन सपकाळांनी माफी मागावी

मुंबई (दै. संध्या) : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी केलेल्या वादग्रस्त विधानचे पडसाद आता उमटण्यास सुरू झाले आहे. सपकाळ यांनी टिपू सुलतानला छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे विधान केले होते. यावरून भाजपने काँग्रेससह सपकाळ यांच्यावर हल्लाबोल सुरू केला आहे. भाजप नेते अमित साटम यांनी ट्विट करत सपकाळ यांच्यावर टीका केली आहे. सपकाळ यांनी तात्काळ नाक घासून माफी मागावी, अशी मागणी साटम यांनी केली आहे. अमित साटम यांनी ट्विट करत म्हटले की, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे वक्तव्य केवळ निंदनीय नाही, तर संतापाच्या पलीकडचे आहे. अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतानाशी करणे हा इतिहासद्रोह आहे, शिवप्रेमींच्या श्रद्धेवर घाला आहे आणि करोडो देशभक्तांच्या भावनांचा अपमान आहे. हा प्रकार महाराष्ट्राच्या अस्मितेवर थेट वार करणारा आहे.

#### अगोदर विमान कोसळले नंतर स्फोट

पुणे (दै. संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा एक नवा व्हिडिओ समोर आला आहे. त्यात विमान जमिनीवर कोसळल्यानंतर त्याला आग लागल्याचे व नंतर अचानक मोठा स्फोट होताना दिसून येत आहे. या व्हिडिओमुळे अजित पवारांच्या अपघाताविषयी पुन्हा एका शंकाकुशंकांचे वादळ उठण्याची शक्यता आहे. अजित पवार यांचा गत 28 जानेवारी बारामती येथील एका विमान अपघातात मृत्यू झाला होता. ते त्या दिवशी बारामती येथे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचारासाठी येत होते. त्यांचे विमान बारामती विमानतळावर उतरत असताना अचानक धावपट्टी शेजारच्या खड्डयात कोसळले. त्यात अजित पवारांसह 5 जणांचा जागीच कोळसा झाला. या दुर्घटनेविषयी आता वेगवेगळ्या शंकाकुशंका व्यक्त केल्या जात आहेत. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांसह इतर काही नेत्यांनी हा घातपात असल्याचा आरोप केला आहे, तर काहींनी ही केवळ दुर्घटना असल्याचा दावा केला आहे.

# सपकाळांच्या विरोधात मराठा आक्रमक

### तोंडाला काळे फासणाऱ्याला एक लाखांचे बक्षीस जाहीर, रस्त्यावरही फिरू न देण्याचा इशारा

सोलापूर (दै. संध्या)



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी केलेल्या वादग्रस्त विधानाचे पडसाद आता उमटण्यास सुरू झाले आहे. सपकाळ यांनी टिपू सुलतानला छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे विधान केले होते. यावर आता मराठा ठोक मोर्चा आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या तोंडाला काळे फासणाऱ्यास 1 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. मराठा ठोक मोर्चाचे सोलापूर येथील समन्वयक महेश डोंगरे यांनी हे बक्षीस जाहीर केले आहे.

सोलापूर येथील मराठा ठोक मोर्चाने हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्यामुळेच काँग्रेस संपली. त्यांच्या तोंडाला जो कोणी काळे फासेल त्याला एक लाखांचे बक्षीस देणार. तसेच हर्षवर्धन सपकाळ यांना मराठा समाज रस्त्यावर फिरू देणार नसल्याचा देखील महेश डोंगरे यांनी इशारा दिला आहे.

मालेगाव महापालिकेतील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतानचा फोटो लावण्यात आला होता. यावर हिंदुत्ववादी संघटनांनी आक्षेप घेतला. त्यानंतर तो फोटो हटवण्यात देखील आला. मात्र, याच वादानंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाणा येथे बोलताना वादग्रस्त विधान केले. टिपू सुलतान यांना देखील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे विधान त्यांनी केले. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याच प्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केले, असे सपकाळ म्हणाले होते.


दरम्यान, वादग्रस्त विधान केल्यानंतर आता हर्षवर्धन सपकाळ यांनी एक्सवर ट्विट करत म्हटले की, माझ्या वक्तव्याची मोडतोड करून 'ध' चा 'मा' करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत, असा आरोप सपकाळ यांनी केला आहे.

काल पत्रकारांनी मला महामानवांचे विशेषतः शिवाजी महाराज व टिपू सुलतान यांचे फोटो कार्यालयात लावण्यासंबंधी होणाऱ्या मागणीसंदर्भात प्रश्न केला होता. त्यावर मी माझे मत नोंदवत म्हणालो होतो की, शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा विचार दिला आणि त्याचा आदर्श टिपू सुलतानने घेतला. याच आदर्शानुसार तो इंग्रजांच्या विरोधात लढला. मी या अनुषंगाने बोललो. पण माझ्या मूळ विधानाला बाजूला ठेवून जे विधान चालवले जात आहे ते भाजपचा खोडसाळपणा आहे. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले, प्रत्येक गोष्टीत जात व धर्म आणणे हा भाजपचा जुना फंडा आहे. या फंड्याच्या अनुषंगाने त्यांनी माझ्या एका जबाबदारपूर्ण विधानाला हिंदू-मुस्लिम अँगलने खतपाणी घातले. त्यांनी माझ्याकडे माफी मागण्याची मागणी केली आहे. ते माफीवीरांच्या पक्षाचे असल्यामुळे त्यांनी ही मागणी केली आहे. माझे विधान मला विचारण्यात आलेल्या प्रश्नाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर त्यातून शिवाजी महाराजांविषयीचा स्वाभिमान दिसून येतो.

## उद्योजकांना पुण्यातच रोखण्यासाठी रत्नपुरी मळ्यात नवी एमआयडीसी

सोलापूर (दै. संध्या)

हजारो एकरांवर डझनभर एमआयडीसी असलेल्या पुण्यात आणखी एका नव्या एमआयडीसीची भर पडत आहे. सोलापूरपासून 100 किलोमीटर अंतरावर असलेल्या इंदापूर येथील रत्नपुरी मळ्यात नवीन एमआयडीसी होत आहे. त्याला राज्य शेती महामंडळाची एक हजार एकर जमीन देण्याच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने एका झटक्यातच मंजुरी दिली. परंतु गेल्या 14 वर्षांपासून प्रस्तावित असलेल्या सोलापूरच्या कुंभारी एमआयडीसीला जलसंपदा विभागाची साधी 'ना-हरकत' (एनओसी) मिळत नाही. त्यासाठी लोकप्रतिनिधी कधीच आक्रमक होताना दिसत नाहीत. वाहतुकीच्या समस्येमुळे पुण्यातील मोठे उद्योग बाहेर पडण्याच्या तयारीत आहेत. टू-टियर शहरांमध्ये सोलापूरने त्यांचे लक्ष वेधले असतानाच, इंदापूरच्या या नियोजित एमआयडीसीने त्यांना रोखून धरण्याचा हा प्रयत्न आहे. अर्थातच पुण्यातील उद्योजकांना पुण्यातच पर्याय देण्यासाठी तिथल्या राजकीय मंडळींनी केलेला हा 'उद्योग' म्हणता येईल.




वास्तविक इंदापूरपासून 59 किलोमीटर अंतरावरच कुरकुंभ एमआयडीसी 1800 एकरांवर विस्तीर्ण पसरली. तिथे जमिनी शिल्लक असताना, इंदापूरच्या रत्नपुरी मळ्यात आणखीन एक एमआयडीसीची निर्मिती होत आहे. त्यामागे प्रबळ राजकीय इच्छाशक्तीच असून ज्याच्या अभावानेच सोलापूरची औद्योगिक पीछेहाट सुरू झाली. अक्कलकोट रस्त्यावरील एमआयडीसीत आता जागा नाही, चिंचोळी एमआयडीसीतही इंचभर जागा नाही. उद्योगांच्या विस्ताराला, नव्या गुंतवणुकीलाच जागा नसल्याने उद्योजक नव्या एमआयडीसींच्या शोधात आहेत.

## गुणवंतांमुळे आपले भविष्य उज्वल असल्याचा विश्वास : मुख्यमंत्री फडणवीस

नागपूर (दै. संध्या)

आज ज्यांना राजरत्न पुरस्कारांनी गौरविण्यात आले, त्यांचे देदीप्यमान कार्य पाहिल्यानंतर आपले भविष्य उज्वल आहे असा विश्वास वाटतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (प्रथम) यांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त आयोजित राजरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (प्रथम) बहुउद्देशीय स्मृती प्रतिष्ठान व महाराज ऑफ नागपूर ट्रस्ट तर्फे सिनियर भोसला पॅलेस येथे आज सायंकाळी हा सोहळा पार पडला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी समर्थ सेवा आणि आध्यात्मिक




विकास मार्ग (दिंडोरी प्रणित) त्र्यंबकेश्वर येथील गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे होते. यावेळी मध्यप्रदेशच्या आरोग्य मंत्री संपतीया उईके, श्रीमंत राजे रघुजी भोसले (पंचम), श्रीमंत राजे मुधोजी भोसले, माजी महापौर दयाशंकर तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते.

## व्यापार करारात शेतकऱ्यांची फसवणूक : राहुल गांधी

नवी दिल्ली (दै. संध्या)

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी रविवारी भारत-अमेरिका व्यापार करारासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाच प्रश्न विचारले. त्यांनी आरोप केला की, या कराराच्या नावाखाली भारतीय शेतकऱ्यांसोबत विश्वासघात होत आहे. गांधी म्हणाले की, हा मुद्दा देशाच्या कृषी क्षेत्राच्या भवितव्याशी संबंधित आहे. त्यांनी पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारत लिहिले की, शेतकऱ्यांना उत्तरे मिळायलाच हवीत. ही फक्त आजची गोष्ट नाही. हे भविष्याबद्दलही आहे. आपण दुसऱ्या कोणत्याही देशाला भारताच्या कृषी उद्योगावर दीर्घकाळ पकड निर्माण करू देत आहोत का? त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर पोस्ट करत



लिहिले- ड्राइड डिस्टिलर्स ग्रेन्स (DDG) आयात करण्याचा काय अर्थ आहे? याचा अर्थ असा आहे का की भारतीय प्राण्यांना जीएम (GM) अमेरिकन मक्यापासून बनवलेले डिस्टिलर धान्य (चारा) खायला दिले जाईल? यामुळे आपली दुग्ध उत्पादने प्रभावीपणे अमेरिकन कृषी उद्योगावर अवलंबून राहणार नाहीत का? जर आपण जीएम (GM) सोया तेलाच्या आयातीला परवानगी दिली, तर मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि देशभरातील आपल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे काय होईल? ते आणखी एका किमतीच्या धक्क्याला कसे सामोरे जातील? जेव्हा तुम्ही 'अतिरिक्त उत्पादने' म्हणता, तेव्हा त्यात काय-काय समाविष्ट आहे? हा कालांतराने डाळी आणि इतर पिके अमेरिकन आयातीसाठी खुली करण्याच्या दबावाचा संकेत आहे का? गैर-व्यापार अडथळे (Non-tariff barriers) दूर करण्याचा काय अर्थ आहे? भविष्यात भारतावर जीएम (GM) पिकांवरील आपली भूमिका शिथिल करण्यासाठी, खरेदी कमकुवत करण्यासाठी किंवा एमएसपी (MSP) आणि बोनस कमी करण्यासाठी दबाव टाकला जाईल का? एकदा हे दार उघडले की, दरवर्षी ते आणखी उघडण्यापासून आपण कसे थांबवणार? याचा काही प्रतिबंध होईल का, की प्रत्येक वेळी करारामध्ये हळूहळू आणखी पिके टेबलावर ठेवली जातील? राहुल गांधी सातत्याने भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत केंद्र सरकारला प्रश्न विचारत आहेत. ते म्हणाले होते की व्यापार करारामुळे कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर आणि वस्त्रोद्योगावर विपरीत परिणाम होईल. राहुल गांधींनी आरोप केला की, 18% शुल्क विरुद्ध 0% हे स्पष्ट करतो, कसे खोटे बोलण्यात पटाईत असलेले पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ यावर संभ्रम निर्माण करत आहेत, आणि कसे ते भारत-अमेरिका व्यापार करारातून देशातील कापूस उत्पादक शेतकरी आणि वस्त्रोद्योग निर्यातदारांना फसवणूक करत आहेत.

## सुनेत्रा पवारांच्या मदतीला कधीही जाऊ : जयंत पाटील

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी सत्ताधारी राष्ट्रवादीला कोणत्याही वेळी मदत करण्याची तयारी दर्शवली आहे. आमच्या पक्षाकडे शरद पवारांचे नेतृत्व आहे. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे. पण वेळ पडल्यास आम्ही केव्हाही सुनेत्रा पवारांच्या मदतीला धावून जाऊ, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे शरद पवार गटाने विलीनीकरणाच्या चर्चेचा मुद्दा आता मागे टाकल्याचे स्पष्ट झाले आहे. अजित पवारांचे गत 28 जानेवारी रोजी झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून दोन्ही राष्ट्रवादीच्या कथित विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. पण आता जयंत पाटील यांनी ही चर्चा मागे पडल्याचे स्पष्ट संकेत दिलेत. ते



यासंबंधी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, माझी विलीनीकरणाच्या मुद्यावर भाष्य करण्याची इच्छा नाही. शरद पवार आमच्या पक्षाचे नेतृत्व करतात. आमच्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व आहे. आमचा पक्ष त्या दृष्टीने वाटचाल करेल. आमची सुनेत्रा पवार किंवा पार्थ पवार यांच्या समोर अडथळे किंवा प्रश्न उभे करण्याची इच्छा नाही. राजकारणात उद्या काय होईल हे आज सांगता येत नाही. अजितदादांच्या आकस्मिक निधनानंतर हे स्पष्ट झाले. आजचा दिवस उद्या आहे का हे नियतीला मान्य आहे का? असे अनेक प्रश्न आहेत. जयंत पाटील यांनी यावेळी विलीनीकरणाच्या मुद्यावर भाष्य करण्यास ठाम नकार दिला. आज महाराष्ट्रात अनेक प्रश्न आहेत. भारत-अमेरिका करारामुळे शेतकऱ्यांपुढे अनेक नवी आव्हाने निर्माण होणार आहेत. देशाच्या आर्थिक परिस्थितीचे विषय आहेत. इतरही बरेच प्रश्न आहेत. त्यामुळे आमचा प्रश्न त्या दृष्टिकोनातून विचार करेल. राहिला प्रश्न विलीनीकरणाचा, तर त्यावर मला आज भाष्य करण्याचा अधिकार नाही आणि भाष्य करावे असे वाटतही नाही. आमची ज्या माणसाशी, नेत्याशी चर्चा झाली, तेच नसल्यामुळे अशा प्रश्नाला उत्तर देण्याची मला आवश्यकताही वाटत नाही. सुनेत्रा पवार बारामतीत असताना आम्ही 4-5 जणांनी त्यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. आम्ही त्यांना सांगितले की, काही अडचण असेल, काही प्रश्न असतील, तर आम्हाला सांगा. आम्ही कधीही तुमच्या मदतीला धाऊन येऊ.

## तारिक रहमान यांच्या शपथविधीला भारताचा बडा नेता राहणार उपस्थित

मुंबई (दै. संध्या)

बांगलादेशच्या १३व्या संसदीय निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी)ने दणदणीत बहुमत मिळवले आहे. बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान हे नवनिर्वाचित पंतप्रधान म्हणून १७ फेब्रुवारी २०२६ रोजी शपथ घेणार आहेत. या शपथविधी सोहळ्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार नसून, त्यांच्या जागी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री हे भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. हा सोहळा ढाकातील राष्ट्रीय संसद भवनाच्या दक्षिण प्लाझा येथे पार पडणार आहे. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या या निवडणुकीत बीएनपीने २१२ जागा जिंकल्या (बीएनपी २०९ +



मित्रपक्ष ३), तर जमात-ए-इस्लामीच्या आघाडीने फक्त ७७ जागा मिळवल्या. एकूण २९९ जागांपैकी २९७ जागांचे निकाल जाहीर झाले असून, बीएनपीला दोन तृतीयांश बहुमत मिळाले आहे. ही निवडणूक २०२४ मधील विद्यार्थी-नेतृत्वाखालील आंदोलनानंतर झालेली पहिली मोठी सार्वत्रिक निवडणूक होती, ज्यामुळे शेख हसीना यांच्या सरकारचा अंत झाला आणि अंतरिम सरकारचे नेतृत्व मुहम्मद युनूस यांच्याकडे आले.

# 'पंढरपूर कॉरिडॉर'ला भाजपमधूनच विरोध

मुंबई (दै. संध्या)

■ प्रस्तावित प्रकल्प सरकारी पैशाचा गैरवापर, सुब्रमण्यम स्वामी यांचे मुख्यमंत्र्यांना खरमरीत पत्र

भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी पंढरपूर येथील पवित्र व प्राचीन विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉरला कडाडून विरोध दर्शवला आहे. या प्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रस्तावित कॉरिडॉरवर फेरविचार करण्याची विनंती केली आहे. सरकार या प्रकरणी वारकरी संप्रदाय व विठ्ठल भक्तांच्या हितासाठी पंढरपुरातील ऐतिहासिक



मठ, मंदिरे, वाडे व रहिवासी घरांच्या उद्ध्वस्तीकरणाशिवाय आध्यात्मिक, सांस्कृतिक वारसा जतन करणारा पर्यायी व्यवहार्य मार्ग काढेल, असा विश्वास त्यांनी या प्रकरणी व्यक्त केला आहे.

सुब्रमण्यम स्वामी रविवारी आपल्या एका ट्विटमध्ये म्हणाले, पंढरपूर येथील पवित्र आणि प्राचीन विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील 'प्रस्तावित कॉरिडॉर' प्रकल्पाचा पुनर्विचार करण्यासाठी मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. मला आशा आहे की येथील नागरिक , वारकरी संप्रदाय, आणि विठ्ठल भक्तांच्या हितासाठी, महाराष्ट्र सरकार या ठिकाणचे प्राचीन ऐतिहासिक मठ-मंदिरे-वाडे आणि रहिवासी घरांच्या उध्वस्तीकरणाशिवाय, आध्यात्मिक, सांस्कृतिक वारसा जतन करणारा पर्यायी व्यवहारिक मार्ग काढेल.


सुब्रमण्यम स्वामी आपल्या पत्रात म्हणतात, महाराष्ट्र सरकारने पवित्र पंढरपूर शहरात कॉरिडॉर योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने हा निर्णय वाराणसी व उज्जैन येथील कॉरिडॉरला डोळ्यापुढे ठेवून घेतल्याचे दिसते. पण पंढरपूरची जनता, श्री. विठ्ठल - रुक्मिणी भक्त व वारकरी संप्रदायाच्या अनुयायांच्यावतीने या कॉरिडॉरवर आमचे काही आक्षेप आहेत. आम्ही हे आक्षेप तुमच्या निदर्शनास आणू इच्छितो.

पुराण काळापासून पंढरपूर हे 'पवित्र ट्रिनिटी' म्हणून ओळखले जाते. हिंदू दंतकथेनुसार, पंढरपूर क्षेत्र हे तीर्थ आणि दैवत आहे. पंढरपूर हे 'लोहदंड' म्हणून ओळखले जाणारे एक पवित्र ठिकाण होते, जिथे पवित्र भीमा नदी 'चंद्रभागा तीर्थ' चे रूप घेते. म्हणूनच विठ्ठलाने हे ठिकाण आपले निवासस्थान म्हणून निवडले. यामुळेच ते भुवैकुंठ मानले जाते.

## सोलापूर-गोवा विमानसेवा आजपासून तीन दिवस रद्द

सोलापूर (दै. संध्या)

गोवा विमानतळावर रन-वेचे काम सुरू असल्याने तेथून टेकऑफ किंवा लॅण्डींग होण्यास अडचणी आहेत. त्यामुळे फ्लाय 91 एअरलाईन्सने 15, 16 आणि 18 फेब्रुवारी रोजी सोलापूर-गोवा विमानसेवा रद्द केली आहे. शिवाय तांत्रिक अडचणींमुळे स्टार एअरनेही 17 फेब्रुवारी रोजी मुंबईची सेवा रद्द केली आहे. सोलापूर-गोव्याची विमानसेवा सोमवार, शुक्रवार, शनिवार आणि रविवार असे चार दिवस सुरु आहे. तर सोलापूर-मुंबईची विमानसेवा नियमितपणे सुरु आहे. गोव्याला जाण्यासाठी 15 व 16 फेब्रुवारीसाठी 110 प्रवाशांनी तिकिटाचे बुकींग केले



होते. परंतु ऐनवेळी एअरलाईन्सने विमानसेवा रद्द केल्याने त्यांच्या प्रवासाची अडचण झाली आहे. या प्रवाशांना एअरलाईन्सकडून तिकिटाचे 100 टक्के पैसे परत दिले जाणार आहेत किंवा इतर दिवसाच्या तिकिटाचे बुकींग करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सोलापूर विमानतळावर कोणत्याही अडचणी नाहीत. सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत. तीन दिवस विमानसेवा रद्द होण्यासाठी सोलापूर विमानतळाचा अडसर ठरलेला नाही. केवळ गोवा विमानतळावर सुरु असलेल्या कामांमुळे या सेवा रद्द करण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले. गोवा विमानतळावर कामे सुरु असल्याने तेथील सेवा 3 दिवस बंद राहणार असल्याचे कळवण्यात आले. प्रवाशांना दुसऱ्या दिवशी तिकीट दिले जाईल किंवा त्यांचे पैसे परत केले जातील. 20 ते 23 फेब्रुवारी या तीन दिवसांच्या कालावधीत मात्र गोव्याची फ्लाईट फुल्ल आहे. मुंबईच्या सेवेलाही 80 टक्के प्रतिसाद आहे.

## संपादकीय

# शहरं खरंच स्मार्ट होणार?

भारताच्या शंभर शहरांना 'स्मार्ट' बनवण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प जाहीर झाला तेव्हा २०१६ साल होते. पाच वर्षांत शहरी भारताचा चेहरामोहरा बदलेल, तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशासन उभे राहील, सार्वजनिक सेवा कार्यक्षम होतील, असे चित्र रंगवले गेले. जवळपास दशक उलटले. माहिती अधिकारातून मिळालेल्या उत्तरानुसार फेब्रुवारी २०२६ पर्यंत निवडलेल्या १०० शहरांपैकी फक्त ३१ शहरांचे काम पूर्ण झाले आहे. ४३ शहरांचे काम अंतिम टप्प्यात, तर उर्वरित २६ शहरांमध्ये अजूनही काम सुरू आहे. हा आकडा केवळ सांख्यिकी माहिती नाही; तो आपल्या शहरी नियोजनाच्या क्षमतेचे आरसे दाखवणारा आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार आतापर्यंत ८,०६७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत; एकूण नियोजित कामांपैकी सुमारे ९४ टक्के. एकूण खर्च १.६४ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. त्यापैकी ३१ शहरांवरच सुमारे ५९,३८५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. इंदूर, सुरत, वाराणसी, भोपाळ, पुणे, चंडीगड यांसारखी शहरे पूर्ण झालेल्यांच्या यादीत आहेत. इंदूरने २३१ प्रकल्प पूर्ण करून ३,७५१ कोटी खर्च केले आहेत. पहिल्या दृष्टिक्षेपात ही प्रगती प्रभावी वाटते. रुंद रस्ते, एलईडी दिवे, सार्वजनिक वाय-फाय, स्मार्ट ट्रॅफिक सिस्टीम, एकात्मिक कमांड अँड कंट्रोल सेंटर, नव्याने विकसित सार्वजनिक चौक—ही सगळी दृश्यमान चिन्हे आहेत. काही शहरांमध्ये कचरा व्यवस्थापन सुधारले, जलपुरवठा व्यवस्था कार्यक्षम झाली, डिजिटल सेवांमुळे नागरिकांना काही सुविधा घरबसल्या मिळू लागल्या. मग प्रश्न कुठे आहे? याचे उत्तर या आकड्यांमध्ये नाही, तर त्यापलीकडे आहे. स्मार्ट सिटीज मिशनची रचना संपूर्ण शहर पुनर्बांधणीची नव्हती, हे सरकारने स्पष्ट केले आहे. 'एरिया-बेस्ड डेव्हलपमेंट'—म्हणजे निवडक भागांचे आदर्श रूपांतर, आणि ते मॉडेल इतरत्र विस्तारता येईल अशी कल्पना. म्हणजेच शहराचा एक भाग 'स्मार्ट' करायचा, आणि त्यातून उर्वरित भागाला प्रेरणा द्यायची. परंतु, एखाद्या शहरात दोन वेगळे वास्तव निर्माण झाले तर? एका बाजूला स्मार्ट रस्ते, हरित पट्टे, निगराणी करण्यासाठी कॅमेरे; तर दुसऱ्या बाजूला पाणीटंचाई, झोपडपट्ट्या, वाहतूक कोंडी आणि प्रदूषण. अशा वेळी आपण त्या शहराला कितपत स्मार्ट म्हणायचे? केंद्र सरकारने जी आकडेवारी जाहीर केली आहे त्यानुसार ३१ शहरे स्मार्ट झाली आहेत. म्हणजेच त्यातील काही भागांमध्ये ठरविलेले काही प्रकल्प पूर्ण झाले आहेत. ही संपूर्ण शहरे स्मार्ट झालेली नाहीत. हे परिवर्तन सोपे नाही, हे मान्य केले तरीही सुरुवातीला आखलेले वेळापत्रक वास्तववादी होते की घोषणात्मक होते? या उपक्रमामुळे शहरी भारतात तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशासनाची पायाभरणी झाली. डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया सुरू झाली. महापालिकांच्या कार्यपद्धतीत बदल घडू लागले. प्रतिसादक्षमता वाढली. नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोजता येण्याजोगे बदल दिसू लागले, असे सांगितले जाते. पण पायाभूत सुविधा उभारणे आणि जीवनमान सुधारणे यात फरक आहे. रस्ते रुंद झाले, पण प्रदूषण कमी झाले का? कमांड सेंटर उभे राहिले, पण गुन्हेगारीवर शाश्वत परिणाम झाला का? सार्वजनिक जागा सुशोभित झाल्या, पण परवडणाऱ्या घरांची समस्या सुटली का? पाण्याचा पुरवठा सुधारला, पण दीर्घकालीन जलसुरक्षेचे नियोजन झाले का? शहर म्हणजे केवळ पायाभूत सुविधा नव्हे; ते सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय घटकांचे गुंतागुंतीचे जाळे असते. स्मार्ट सिटीज मिशनने यापैकी किती गोष्टींना स्पर्श केला? आज उर्वरित ४३ शहरे अंतिम टप्प्यात आहेत, म्हणजे या शहरातील प्रकल्प अंतिम टप्प्यात आहेत. विशाखापट्टणम, गुवाहाटी, अहमदाबाद, गांधीनगर, शिमला, बेंगळुरू, कोची, तिरुअनंतपुरम इत्यादी. आणखी २६ शहरे अजून वेळ मागत आहेत. त्यामध्ये पोर्ट ब्लेअर, तिरुपती, इटानगर, श्रीनगर अशा शहरागणिक प्रगती वेगवेगळी आहे. काहींनी वेग पकडला, काही मागे पडली. हा फरक का पडला? राज्य सरकारांचा पाठिंबा, स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता, निधी वितरणातील गती, तांत्रिक कौशल्य—याचा परिणाम झाला का? की काही शहरांनी केवळ कागदोपत्री प्रगती दाखवली आणि काहींनी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर दिला? या सगळ्यांची खरी उत्तरे शोधून येत्या काळासाठी नवीन योजना आखणे आवश्यक आहे.

## आगामी साप्ताहिकी

१६ फेब्रुवारी २०२६ सोमवार
सोमवती अमावास्या सायं ५.३३ पासून
अमावास्या प्रारंभ सायं ५.३३

१७ फेब्रुवारी २०२६ मंगळवार
माघ अमावास्या
कंकणाकृती सूर्यग्रहण (भारतातून दिसणार नसल्यामुळे वेधादि नियम पाळू नयेत.)
क्रांतिवीर लहुजी साळवे पुण्यति
नाथयात्रा – मांगरूळ
वासुदेव बळवंत
फडके पुण्यतिथी
अमावास्या समाप्ती सायं ५.३०

१८ फेब्रुवारी २०२६ बुधवार
चंद्रदर्शन
फाल्गुन मासारंभ
निळोबाराय यात्रा – प्रारंभ – पिंपळनेर (अहिल्यानगर)

१९ फेब्रुवारी २०२६ गुरुवार
गोपाळकृष्ण गोखले पुण्यतिथी
मुस्लिम रमजान मासारंभ
छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तारेखप्रमाणे
रामकृष्ण जयंती
दादाजी महाराज साल्पेकर पुण्यतिथी – नागपूर

२० ऑगस्ट २०२० शुक्रवार
अप्पा महाराज पुण्यतिथी – जळगाव

२१ फेब्रुवारी २०२६ शनिवार
विनायक चतुर्थी
जागतिक मातृभाषा दिन

२२ फेब्रुवारी २०२६ रविवार
शुभ दिवस

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 7 | | 8 | | | | | 9 |
| | 2 | | | 9 | | | 6 | 3 |
| | | | 4 | | 1 | 2 | 5 | 7 |
| | 9 | 4 | | | | 6 | | 2 |
| | | | | 7 | | | | |
| 7 | | 8 | | | | 5 | 9 | |
| 3 | 6 | 7 | 2 | | 4 | | | |
| 8 | 4 | | | 5 | | | 3 | |
| 9 | | | | | 8 | | 2 | 4 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 1 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 7 |
| 5 | 6 | 7 | 1 | 9 | 3 | 2 | 4 | 8 |
| 8 | 4 | 3 | 6 | 2 | 7 | 9 | 5 | 1 |
| 1 | 5 | 9 | 7 | 3 | 4 | 6 | 8 | 2 |
| 6 | 3 | 8 | 2 | 5 | 1 | 7 | 9 | 4 |
| 4 | 7 | 2 | 9 | 8 | 6 | 1 | 3 | 5 |
| 3 | 1 | 4 | 8 | 6 | 2 | 5 | 7 | 9 |
| 2 | 8 | 5 | 3 | 7 | 9 | 4 | 1 | 6 |
| 7 | 9 | 6 | 4 | 1 | 5 | 8 | 2 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७४२ – स्पेन्सर कॉम्प्टन इंग्लंडच्या पंतप्रधानपदी.
- १८३८ – दक्षिण आफ्रिकेत झुलु सैन्याने ब्लौक्रान्स नदीच्या काठी शेकडो फूर्ट्रेकरना मारले.
- १८६२ – अमेरिकन गृहयुद्ध – जनरल युलिसिस एस. ग्रँटने फोर्ट डोनेलसनचा किल्ला काबीज केला.
- १९१८ – लिथुएनियाने रशिया व जर्मनीपासून स्वातंत्र्य जाहीर केले.
- १९२३ – प्राचीन इजिप्तचा राजा तुतेनखामेनची कबर उघडण्यात आली.
- १९४५ – दुसरे महायुद्ध – अमेरिकेच्या सैन्याने बटान परत मिळवले.

### राष्ट्रीय

- २००८ – पाकिस्तानच्या कुख्यात 'आयएसआय' संस्थेचा हस्तक शैलेश जाधव याला पुणे पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने अटक केली. शैलेश जाधव लष्करात कारकून होता. अपहारप्रकरणी त्याच्यावर कोर्ट मार्शल झाले. शिक्षा म्हणून त्याला येरवडा कारागृहात ठेवले होते.


### जन्म

- १०३२ – यिंगझाँग, चीनी सम्राट यांचा जन्म.
- १२२२ – निचिरेन, जपानमधील निचिरेन बौद्ध पंथाचा स्थापक यांचा जन्म.
- १९४१ – किम जोँग-इल, उत्तर कोरियाचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९५४ – मायकेल होल्डिंग, वेस्ट इंडीझचा क्रिकेटपटू यांचा जन्म.

### निधन

- १२७९ – अफोन्सो तिसरा, पोर्तुगालचे राजा यांचे निधन.
- १३९१ – जॉन पाचवा पॅलिओलोगस, बायझेन्टाईन सम्राट यांचे निधन.
- १८९९ – फेलिक्स फॉउ, फ्रांसचे राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६१



### आडवे शब्द

१. पटकन, चटकन
४. प्राणी
७. विसराळू
१०. मायेची सावली
१२. पातळ खांब
१५. कपाळ
१७. आईचा भाऊ
१९. मज्जाव
२०. फुरसत
२१. एक श्वासरोग
२२. नवरा
२३. भाकरीचे एक धान्य
२४. उद्याच्या नंतरचा दिवस
२६. माहेरी आलेली स्त्री
२८. पूर्ण भरतीची वेळ
२९. दिवटी
३२. महासर्प
३५. पाणी
३६. चलनवलन
३९. तमाशा
४०. थेट
४१. केशरी गराचे व हिरव्या सालीचे फळ
४३. संरक्षणाचे आवरण
४४. दात
४५. पहारेकरी
४८. स्वत:ला
४९. गोंजारणे, समजूत काढणे
५०. अखंड
५१. मैत्रीण
५२. तोंड
५३. पुन्हा पुन्हा
५७. जिवलग
६०. चेष्टा, टिंगलटवाळी
६१. सीतेचे वडील
६३. एक चतुर्थांश
६५. माफी मागणारा
६७. छोट्यांची गाणी
७०. चांदीचा बिल्ला
७३. चिंचेची चव
७४. तात्पुरते रुसणे
७५. कोर्टातील कथन
७६. सोन्याची फुले उधळून घेण्याचे हक्कदार
७७. सबब, निमित्त

### उभे शब्द

१. टप्प्या टप्प्यानी केलेला प्रवास
२. अलमारी
३. निर्जीव तरी वाढणारे
५. चौक
६. पाठविलेला
८. मध्यम प्रमाण
९. आकांत करणे
११. रमापती
१३. शिर्डीचे संत
१४. कट्टर
१६. तिबेटी धर्मगुरु
१८. संगीतातील एक राग
१९. मृत्यू
२५. लक्ष्मी
२६. सामान
२७. थंड
३१. रेशमी वीण असलेल्या पदराची साडी
३२. फावला वेळ
३३. विश्व
३४. अखबार
३६. जादू
३७. रेशमाची गुंडाळी
३८. गडीमाणसे
४१. आपले नसलेले
४२. प्रश्न
४३. विद्या
४६. अफूचे बी
४७. निकट, जवळ
४८. मनातील इमले
५१. हेतूपूर्वक
५३. तपासणी करणारा, पारखी
५४. मुलगी
५५. धोबी
५६. शरीर
५८. वैयक्तिक
५९. मेहेरबानी
६२. खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
६४. राबता, जाणे येणे
६६. पाऊले
६८. खोटी तात्पुरती भावना
६९. युवक
७०. चांदी
७१. अर्धी ओंजळ
७२. सावध
७३. आम्रफल

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६० चे उत्तर

आडवे उत्तर : १.हिवाळा उन्हाळा पावसाळा ७.परवचा ११.गाणी १२.रीमा १४.मादक १५.तवंग १६.घराणे १७.नराधम २०.नरम २२.पाट २३.घर २४.सुधारक २५.माग २६.छान २७.खानसामा २९.रया ३०.नीर ३१.नीम ३३.दाभण ३४.सनविवि ३७.सय ३८.कासरा ४०.साठी बुद्धी नाठी ४२.तप ४४.मम ४५.पारवा ४६.वंग ४८.रद ५०.गारढोण ५१.मात ५३.बालकामगार ५४.वसतिगृह ५६.यान ५७.मराठा ५८.पांडव ६०.मजल ६१.हिंदुस्थान ६२.हार ६३.कडवे ६४.मलमास ६६.माळी ६७.शरपात ७०.कलम ७३.काका ७५.सतलज ७८.समाधान ७९.रसद ८०.कमनशिबी ८१.तगमग

उभे उत्तर : २.वाळवंट ३.उगा ४.न्हाणीघर ५.वरी ६.सामानसुमान ८.रमा ९.वद १०.चाकरमानी १३.अधर १५.तपासनीस १८.राधा १९.मकर २१.मगरमिठी २३.घनदाट २७.खाणकामगार २८.सासरा ३२.मयत ३५.विसावा ३६.बुद्धिवंत ३९.समर ४१.नाग ४३.परकायाप्रवेश ४५.पाणवठा ४७.आबाळ ४९.दमन ५१.माह ५२.जनावर ५५.गृहस्थाश्रम ५७.मलम ५९.डहाळी ६०.महापातक ६१.हिंसक ६३.कलाकार ६५.लता ६६.मागोमाग ६८.रस ६९.तलम ७१.लगत ७२.मनन ७४.ध्येय ७६.जन ७७.कोबी ७८.सम

## उपदेशकथा

### हृदयाचा खंबीरपणा

महात्मा गांधी आफ्रिकेत असतानाची ही गोष्ट. एक दिवस त्यांच्या नावाची तार आली. त्या तारेत त्यांचे थोरले बंधू श्री. लक्ष्मीदास हे ८ मार्च १९१४ ला पोरबंदरला वारल्याचं कळवलं होता! ती तार गांधीजींनी वाचली, अन लगेच दुसऱ्याजवळ दिली, ती वाचून तिथल्या त्यांच्या सगळ्या चाहत्यांना फार वाईट वाटलं. पण गांधीजींचं अंत:करण होतं खंबीर. त्यांचा 'साह्यकर्ता दादा' गेल्याचं ते दु:खदायक तर होतंच होतं. पण तरीही गांधीजींच्या नित्याच्या क्रमात काही खंड पडला नाही. आपलं काम रोजच्या सारखं ते संध्याकाळपर्यंत करीत राहिले. दररोज संध्याकाळी प्रार्थना ठरलेली. ती आटपली अन् सगळे जण गांधीजींकडे पाहतात, तो त्यांचा कंठ दाटून आला! डोळेही आसवांनी डबडबलेच. पण ते दु:ख गिळून, ते सर्वांना म्हणाले, 'मी दिवसभर बोललो नाही, पण माझे वडील बंधु गेल्याची ती तार वाचली अन् मला अतिशय दु:ख झालं. पण काही झालं तरी, आपलं दैनंदिन काम हे चाललंच पाहिजे. त्यात खंड पडू देणं योग्य नाही. म्हणूनच या वेळपर्यंत मी कुणालाच काही सांगितलं नाही. मृत्यू हा ईश्वराधीन असतो. पण आपलं काम मात्र आपल्या स्वाधीनच.

कथा उपदेश : स्वकर्म सतत करीत राहणं हीच ईश्वराची खरी पूजा होय.

## : SMS :

Pati office jaa
Raha Tha..
Patni pyar Se
Boli-'See u in
The 'Evening'
Pati Gusse Se-
'Dhamki Kise de
Rahi Hai,Main bhi
Tujhe dekh Lunga,'

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
एखादी महत्त्वाची पण विलंबाने झालेली कृती फायद्याची जाणवेल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
नोकरी-व्यवसायात फार मोठा धोका पत्करणे सध्या तरी योग्य ठरणार नाही.

**मिथुन :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण
निरनिराळ्या सुचणाऱ्या कल्पना व्यावसायिकदृष्ट्या आत्ताच अंमलात आणू नका.

**कर्क :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
व्यवहार अनपेक्षित फलदायी ठरतील. संततीच्या महत्त्वाच्या प्रश्नामध्ये निर्णायक यश मिळेल.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
वैवाहिक जीवनात वैवाहिक साथीदाराचा पूर्ण पाठिंबा आपले मनोधैर्य वाढवणारा ठरेल.

**कन्या :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
काही विशेष कामानिमित्त आपणास लांबच्या प्रवासाचे बेत आखावे लागतील.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर
आर्थिकदृष्ट्या अनेक मोठे प्रश्न हातावेगळे करू शकाल.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर
आर्थिकदृष्ट्या कोणत्याही आश्वासनांवर विसंबून न राहता हाती येईल तेच खरे ही भूमिका घ्या.

**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर
काहींना अचानक धनलाभाच्या संधी मालामाल करतील. दीर्घ सहलीचा आनंद सहकुटुंब लुटाल.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व
नोकरी-व्यवसायात मोठे लाभ होतील तसे परिचितांचा गट वाढेल. आपल्या कामात त्याचा उपयोग करून घेऊ शकाल.

**कुंभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
व्यापारी वर्गाला आपले व्यापारकौशल्य सिद्ध करता येईल. महत्त्वाचे निर्णय फायदेशीर ठरतील.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
सामाजिक यशात थोरामोठ्यांचा सहभाग अपेक्षित राहील. काहींना नवा प्राप्तीमार्ग हाती आल्याचा आनंद होईल.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.६ | १८ |
| अहमदनगर | २८.६ | १५.९ |
| अकोला | ३२.३ | १९.३ |
| अमरावती | ३१.२ | १९.१ |
| बीड | ३२.३ | १८.५ |
| भंडारा | ३१.६ | १६.९ |
| बुलढाणा | २४.८ | ११.३ |
| चंद्रपूर | ३२.३ | २०.२ |
| चेन्नई | ३१.३ | २१.८ |
| नवी दिल्ली | २५ | ११.५ |
| धुळे | ३१.७ | १९.५ |
| गोंदिया | ३०.२ | १७.३ |
| जळगाव | ३२.३ | १७.४ |
| कोल्हापूर | २९.६ | १६.६ |
| लातूर | ३०.२ | १७.१ |
| मुंबई | ३२.२ | २२.९ |
| नागपूर | ३०.८ | १९.२ |
| नांदेड | ३१.५ | १९.१ |
| नंदूरबार | ३०.४ | १८.३ |
| नाशिक | ३०.१ | १५.१ |
| पुणे | २९.२ | १५.५ |
| पंढरपूर | २९.९ | १७ |
| सातारा | ३०.१ | ९.७ |
| सांगली | ३०.४ | १४.८ |
| सोलापूर | ३०.७ | १७.८ |
| वर्धा | ३१.८ | १८ |

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:शकुनि १७:३४:२० |
| १६ फेब्रुवारी २०२५ | करण:चतुष्पाद |
| सोमवार | २९:३६:३३+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:कुम्भ |
| माघ शके संवत्– १९४७ | चन्द्र:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शाबान |
| मास– माघ | तारीख –२७ |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| कृष्ण पक्ष | सोमवती अमावास्या |
| तिथि:चतुर्दशी १७:३४:२० | सायं ५.३३ पासून |
| नक्षत्र:श्रवण २०:४७:३१ | अमावास्या प्रारंभ |
| योग:वारीयन | सायं ५.३३ |
| २५:४९:३०+ | |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर येथे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते शासकीय पुजा संपन्न

■ भीमाशंकर महोत्सव आयोजन करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा मानस

पुणे (दैनिक संध्या) : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज खेड तालुक्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात विधिवत शासकीय पूजा करुन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. येत्या काळात परिसरातील नागरिकांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याच्यादृष्टीने येत्या काळात 'भीमाशंकर महोत्सव' आयोजन करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी उप विभागीय अधिकारी अनिल दौडे, मंदिर समितीचे पदाधिकारी, स्थानिक प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री. डुडी म्हणाले, देशातील १२ ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या भीमाशंकर मंदिराच्या दर्शनासाठी मोठ्याप्रमाणात भाविक येत असतात. आगामी काळात नाशिक येथे कुंभमेळा होणार असून त्याचा विचार करता मंदिराच्या विकासासोबतच परिसरातील रस्ते,पाणी पुरवठा, सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प 'एसटीपी' ची कामे करण्यात येत असून ती लवकरच पूर्ण होतील, अशा विश्वास श्री. डुडी यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले मंदिर परिसरातील विकासकामाकरिता ९ जानेवारी ते ९ एप्रिल २०२६ या कालावधीत भविकांची सुरक्षितता विचारात घेता मंदिर बंद ठेवण्यात आले आहे, कामाची पाहणी केली असता दर्जेदार पद्धतीने विकासकामे होत असून ९ एप्रिलपर्यंत मुख्य मंदिराचे काम पूर्ण होईल व त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे, जरी मंदिर बंद असले तरी श्री भीमाशंकराची दैनंदिन नियमित पूजा होत आहे, त्यामुळे भाविकांनी सहकार्य करावे,असे आवाहन श्री. डुडी यांनी केले.

### आरोग्य शिबीराचा हजाराहून अधिक नागरिकांनी घेतला लाभ : सुरेंद्रसिंग धुप्पर



पुणे (दैनिक संध्या) : 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर कॅम्प येथील गुरुद्वारा गुरुनानक दरबारच्यावतीने आरोग्य शिबीरे आयोजित करुन नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली असल्याची माहिती गुरुनानक मेडिकल फाऊंडेशन सदस्य सचिव सुरेंद्रसिंग धुप्पर यांनी दिली. श्री. म्हणाले, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त साहिबांच्या हौतात्म्याची माहिती भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हिंद-दी-चादर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे साहिबजीचे त्याग,शौर्य व मानवतेचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी हा कार्यक्रम महत्वपूर्ण आहे. गुरुनानक मेडिकल फाऊंडेशनच्यावतीने महिलांच्या गर्भाशयाच्या कर्करोगाची तपासणी करिता 'सर्व्हायकल कॅन्सर' शिबीर, नेत्र तपासणी शिबीर, तसेच पोलीस कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी तसेच खासगी दुकानातील कामगारांची निःशुल्क तपासणी करण्यात आली असून या शिबिराचा हजाराहून अधिक नागरिकांनी लाभ घेतला आहे, अशी माहिती श्री.धुप्पर यांनी दिली.




### तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्स स्कूलचे नेत्रदीपक यश

पुणे (दैनिक संध्या) : चौथ्या ओपन नॅशनल तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्स हायस्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत फायट क्योरुगी, पूमसे, स्पीड किक, स्पीड पंच, जंप किक ब्रेकिंग, सेल्फ डिफेन्स व हापकिडो अशा विविध प्रकारांमध्ये खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. एकूण ३५ सुवर्ण, ४० रौप्य व १५ कांस्य पदकांची कमाई केली. राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धेत महाराष्ट्रासह कर्नाटक, हरियाणा, गुजरात, आंध्रप्रदेश आदी राज्यांतून १३०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. यावेळी पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक योगेश मुळीक, नारायण गलांडे, नगरसेविका श्वेता गलांडे व कविता गलांडे, सामाजिक कार्यकर्ते मारुती गलांडे व महेंद्र गलांडे, माजी नगरसेवक संदीप जारड, प्रमोद निम्हण, विनायक निम्हण, शंतनू गलांडे, उद्योजक विलास गलांडे, एकनाथ भंडारी, तिरुपती भंडारी व बसवराज भंडारी उपस्थित होते. तायक्वांदो क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ग्रँड मास्टर्स व मास्टर्स यांच्या उपस्थितीने स्पर्धेला प्रोत्साहन मिळाले. श्री. दक्ष रमेश आढाव यांनी स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य केले. सरंग धोका, योगेश मुदलियार, श्रीनिवास केडगोंनी, आरती पासरकर, स्वाती भंडारी, राखी केडगोंनी, विनोद बांगर, गिरीश पाटील, वंदना बांगर, योगेश कुलकर्णी, राजेंद्र साळुंखे, विशाल गावते, दीपक कांगडे, संगीता कांगडे, वैभव नाईकवाडे, डॉ. पायल करखिले, डॉ. सुप्रिया कुलकर्णी, ब्रिजेट पाटील आदींनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्स स्कूलचे खेळाडू, प्रशिक्षक व पंच यांनी स्पर्धेत मोलाचे योगदान दिले. यशस्वी खेळाडूंचा सन्मान सेंट फेलिक्स स्कूलच्या वतीने प्रांतीय प्रमुख सिस्टर उर्सुला पिंटो, सिस्टर जेनिफर परेरा, स्कूल मॅनेजर सिस्टर रोझमेरी अल्मेडा, प्राचार्या लीना पॉल, सिस्टर एल्सा, तसेच बेला डी'सिल्वा, पी.टी. शिक्षिका सोनाली राजेभोसले व रुपाली बन्सोडे यांनी केला. संपूर्ण स्पर्धेचे आयोजन व खेळाडूंना मार्गदर्शन मास्टर रविंद्र भंडारी यांनी केले.

### प्रवाशांसाठी भारत टॅक्सी सेवा सुरु

पुणे (दैनिक संध्या) : पुणे विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आता एक नवीन आणि परवडणारी वाहतूक सुविधा उपलब्ध आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने येथे "भारत टॅक्सी" सेवेची चाचणी सुरू केली आहे. पुणे हे निवडक विमानतळांपैकी एक आहे जिथे हा पायलट प्रकल्प राबविण्यात आला आहे. खाजगी ॲप-आधारित टॅक्सींप्रमाणे, ही सेवा गर्दीच्या वेळी किंवा रात्री उशिरा भाडे आकारणार नाही. भाडे प्रति किलोमीटर निश्चित दरावर आधारित असेल. ज्यामुळे प्रवाशांना त्यांच्या एकूण देयकाची आगाऊ स्पष्ट कल्पना येईल. यामुळे पारदर्शकता आणि विश्वास दोन्ही वाढण्याची अपेक्षा आहे. ही सेवा राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) द्वारे चालवली जाईल. या योजनेअंतर्गत, चालक हा वाहनाचा मालक असेल, ज्यामुळे कोणत्याही मध्यस्थांना कमिशन देण्याची गरज राहणार नाही आणि संपूर्ण उत्पन्न थेट त्यांच्याकडे जाईल. यामुळे चालकांचे उत्पन्न वाढण्याची अपेक्षा आहे.

# व्हॅलेंटाईन डे ला शालेय विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरणाचा संदेश

## 'वनराई पर्यावरण बालोत्सव' थाटामाटात संपन्न




पुणे (दै. संध्या) :

एकीकडे तरुणाई व्हॅलेंटाईन डे साजरा करत असताना दुसरीकडे शालेय विद्यार्थ्यांनी पर्यावरण जनजागृतीचा संदेश देत हा दिवस साजरा केला. पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'वनराई पर्यावरण बालोत्सव' उत्साहात आणि थाटामाटात पार पडला. पथनाट्य आणि लोककला स्पर्धांतील प्रत्येकी प्रथम तीन विजेत्या संघांनी प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. भारूड, पोवाडा, कीर्तन आणि पर्यावरण विषयक गीते यांमधून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा विचार मांडला. विजेत्या विद्यार्थ्यांनी गावागावांमध्ये जाऊन पर्यावरण जनजागृती करण्याची ग्वाही दिली. टिळक स्मारक मंदिर येथे झालेल्या या आंतरशालेय पर्यावरण सांस्कृतिक सोहळ्यात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. 'नाळ' चित्रपटातील राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते बालकलाकार श्रीनिवास पोकळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

वनराईतर्फे दरवर्षी पर्यावरण जनजागृतीसाठी विविध स्पर्धा घेतल्या जातात, यंदा प्रथमच पथनाट्य आणि लोककला स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. एकूण ७० शाळांनी सहभाग नोंदवला असून त्यापैकी ३० शाळा अंतिम फेरीत पोहोचल्या होत्या. शिक्षकांनी सुंदर पद्धतीने रचलेली आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेली सादरीकरणे लक्षवेधी ठरली.

यावेळी वनराईचे विश्वस्त रोहिदास मोरे, सागर धारिया, सचिव अमित वाडेकर, अकोला जिल्हाप्रमुख बबनराव कानकिरड, जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. विनोद शहा, प्रा. वसंत बंग आदी मान्यवर उपस्थित होते. स्व. डॉ. मोहन धारिया स्मृती पुरस्कार, स्व. अण्णासाहेब बेहेरे स्मृती पुरस्कार आणि स्व. तुळसाबाई सातारकर स्मृती पुरस्कार यांसारख्या मानाच्या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी इंदिरा बेहेरे चॅरिटेबल ट्रस्ट आणि महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका यांचे सहकार्य लाभले.

शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून पर्यावरण संवर्धन व शाश्वत ग्रामीण विकासाचा कार्यविस्तार पुढील पिढ्यांपर्यंत नेण्यासाठी 'वनराई'ची पर्यावरण वाहिनी कार्यरत आहे. लहान मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची बीजे रोवून त्यांना संवेदनशील व कृतीशील बनविणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सागर धारिया यांनी बालमनावर पर्यावरणाचे संस्कार रुजविण्यासाठी शिक्षकांनी कृतीशील सहभाग घ्यावा, परिसर स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत आणि पर्यावरण सक्षम पिढी घडविण्यासाठी कार्य करावे, असे आवाहन केले.

अमित वाडेकर यांनी सांगितले की, २००२ पासून शाळा-शाळांमध्ये वनराई इको क्लबद्वारे कार्यक्रम राबवले जात असून निबंध, चित्रकला, सांस्कृतिक स्पर्धा, टाकाऊपासून टिकाऊ, स्वच्छ-सुंदर शाळा, औषधी वनस्पती बाग, जलसंवर्धन, वृक्षारोपण आणि घनकचरा व्यवस्थापन अशा विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाचे संस्कार रुजवले जात आहेत.

पर्यावरणीय उत्साहाने भारलेला हा सोहळा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आविष्कार ठरला.

## जीएस ग्लोबल अकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांनी साधला जागतिक विद्यापीठांशी थेट संवाद



पुणे (दै. संध्या) :

परदेशी शिक्षणासाठी मार्गदर्शन करणाऱ्या जीएस ग्लोबल अकॅडमीतर्फे आयोजित जागतिक विद्यापीठांशी थेट संवाद कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भांडारकर रस्त्यावरील संस्थेच्या कॅम्पसमध्ये जागतिक दर्जाच्या विविध विद्यापीठांसोबत थेट संवाद व विद्यार्थी प्रवेश अभियान यशस्वीपणे पार पडले. परदेशातील उच्च शिक्षणासाठी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य होता. या कार्यक्रमात विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या प्रतिनिधींनी तेथील अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, तसेच परदेशातील करिअर संधींबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. पुण्यातील विद्यार्थ्यांमध्ये परदेशी शिक्षणाविषयी वाढती उत्सुकता यामधून दिसून आली.

## महाशिवरात्रीनिमित्त दत्तमंदिरात १०१ किलो चक्क्याची शंकराची पिंडी

### कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे महाशिवरात्रीनिमित्त चक्केश्वराची पूजा



पुणे (दै. संध्या) :

बारा ज्योतिर्लिंगची चित्रे... बदाम, मनुके, द्राक्षे यांसह विविध प्रकारच्या फळे, फुलांनी सजलेली चक्क्याची शंकराची पिंडी आणि रेखीव असा उमा शंकराचा चक्क्याचा मुखवटा लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिरात साकारण्यात आला. बुधवार पेठेतील श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात तयार केलेली १०१ किलो चक्क्याची शंकराची पिंडी व लीना भागवत तसेच लता व प्रमोद भगवान यांनी जागेवर तयार केलेला हा मुखवटा पाहण्याकरिता भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेवक स्वप्नाली पंडित, राघवेंद्र उर्फ बापू मानकर, कुणाल टिळक, यांसह नितीन पंडित यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार, कोषाध्यक्ष युवराज गाडवे, उत्सव प्रमुख महेंद्र पिसाळ, विश्वस्त सुनिल रुकारी, राजेंद्र बलकवडे आदी उपस्थित होते.

मंदिरातील पुरुषोत्तम वैद्य गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सेवेकरी उमेश धर्माधिकारी, प्रताप बिडवे, अशोक दोरुगडे, शोभा गादेकर, नंदकुमार चिप्पा, वैभव निलाखे, वासंती घडशी आदींनी चक्क्याची शंकराची पिंडी आणि आरास दोन तासात साकारली. सुकामेवा, फळे आणि विविध प्रकारच्या फुलांचा वापर करुन ही चक्केश्वराची पूजा साकारण्यात आली.

ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार म्हणाले, महाशिवरात्रीनिमित्त दत्तमंदिरात दरवर्षी चक्केश्वराची पूजा करण्यात येते. यावर्षी १०१ किलो चक्का वापरुन शंकराची पिंडी साकारण्यात आली. भगवान शंकराच्या मुखवट्याची प्रतिकृती हे विशेष आकर्षण होते. तसेच बारा ज्योतिर्लिंगची चित्रे देखील मंदिरात लावण्यात आल्याने भक्तांना एकाच ठिकाणी दर्शन मिळाले. या चक्क्याचे श्रीखंड करून मंदिरातील भक्तांना आणि सामाजिक संस्थांमध्ये देण्यात येईल.

सन २०२२ मध्ये महाशिवरात्रीला उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी श्री दत्त मंदिरात ही पिंड साकारण्यासाठी स्वतः सहभाग घेतला होता याची विशेष आठवण अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार यांनी सांगितली.

## युरोजेनिटल कर्करोगाचे वाढते प्रमाण रोखणे गरजेचे

### डॉ. संजय कुलकर्णी यांचे मत; जागतिक कर्करोग दिनानिमित्त युरोकूल हॉस्पिटलमध्ये संवाद



पुणे (दै. संध्या) :

मूत्रमार्गाशी संबंधित प्रोस्टेट, मूत्रपिंड, मूत्राशय व अंडकोषाचा कर्करोग यांसारख्या युरोजेनिटल कर्करोगाचे प्रमाण देशभरात झपाट्याने वाढत असून, ही बाब गंभीर आणि चिंताजनक आहे. मात्र, योग्यवेळी निदान झाले, तर आधुनिक वैद्यकीय उपचारांच्या मदतीने या कर्करोगावर प्रभावीपणे नियंत्रण मिळवणे शक्य आहे. यासाठी व्यापक जनजागृती, नियमित आरोग्य तपासण्या आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक असल्याचे मत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे युरोलॉजिस्ट व युरोकूल हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले.

जागतिक कर्करोग दिनाच्या औचित्याने बाणेर येथील युरोकूल हॉस्पिटलमध्ये आयोजित माध्यम संवादावेळी डॉ. कुलकर्णी बोलत होते. प्रसंगी भारतातील पहिल्या महिला लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी, रोबोटिक सर्जन डॉ. अमित होसरमनी, युरोऑन्को सर्जन डॉ. रोहित देशपांडे व डॉ. उदय चंदनखेडे, बाणेर-बालेवाडी मेडिकोज असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश देशपांडे, युरोकुलचे प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रमोद भावे आदी उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, "प्रोस्टेट कर्करोगामध्ये लघवी करताना अडथळा, वारंवार लघवी, तर मूत्राशयाच्या कर्करोगात लघवीत रक्त जाणे ही प्रमुख लक्षणे असतात. मात्र, अनेकदा सुरुवातीला ही लक्षणे स्पष्ट दिसून येत नाहीत. त्यामुळे वयाच्या पन्नाशीनंतर नियमित तपासण्या कराव्यात. जीवनशैलीतील बदल, धूम्रपान, तंबाखूचे सेवन, लठ्ठपणा, शारीरिक हालचालींचा अभाव हे कर्करोगाच्या वाढत्या प्रमाणामागील प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे दुखणे अंगावर काढण्याची मानसिकता टाळून वेळेवर डॉक्टरांकडे जावे. उशीर झाल्यास उपचार गुंतागुंतीचे होतात."

डॉ. अमित होसरमनी यांनी रोबोटिक सर्जरी, डॉ. रोहित देशपांडे यांनी किडनी व अन्य कर्करोग, तर डॉ. उदय चंदनखेडे यांनी कर्करोग जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपायांविषयी सांगितले. २०४५ पर्यंत जगभरात कर्करोगग्रस्तांचे प्रमाण तीन कोटी २६ लाखांवर जाईल, तर कर्करोगाने मृत्यू होण्याचे प्रमाण जवळपास पावणेदोन कोटींपर्यंत असेल, असा धोकादायक अंदाजही त्यांनी वर्तविला.

युरोलॉजी व किडनी संदर्भातील आजारांवरील उपचारांकरिता महाराष्ट्र राज्याची महात्मा फुले जनआरोग्य योजना युरोकूल हॉस्पिटलमध्ये लागू झाली असून, गरजू व पात्र रुग्णांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. राजेश देशपांडे यांनी केले.

कर्करोगाविषयी असलेल्या गैरसमजांना दूर करून समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याची गरज आहे.

## केंद्रीय मंत्री नड्डा यांची भेट घेत डॉ. मेधा कुलकर्णी यांची चर्चा

पुणे (दै. संध्या) :

हिंदुस्थान अँटिबायोटिक्स लिमिटेड पुणे येथील कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित २००७ वेतन सुधारणेचा प्रश्न, तसेच पोस्ट-कोविड काळात वाढत असलेल्या 'एव्हॅस्क्युलर नेक्रोसिस (एव्हीएन) ऑफ हिप जॉइंट' या गंभीर आरोग्य समस्येवर राज्यसभा खासदार डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांनी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांची थेट भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. नड्डा यांच्याशी झालेल्या या भेटीत डॉ. कुलकर्णी यांनी 'एचएएल' कर्मचाऱ्यांच्या वेतन प्रश्नाबाबत सविस्तर माहिती दिली. गेल्या जवळपास तीन दशकांपासून कर्मचारी १९९७ च्या वेतनश्रेणीनुसार वेतन घेत असून, २००७ वेतन सुधारणा अद्याप प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक ताण व मनोबलावर विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एचएएल व्यवस्थापनाने आवश्यक सर्व स्पष्टीकरणांसह प्रस्ताव प्रशासकीय मंत्रालयाकडे सादर केला असूनही निर्णय प्रलंबित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. याच भेटीत डॉ. कुलकर्णी यांनी पोस्ट-कोविड काळात महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये युवक व नोकरी करणाऱ्या वयोगटात वाढत असलेल्या 'एव्हॅस्क्युलर नेक्रोसिस ऑफ हिप जॉइंट' या आजाराबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. कोविडमधून बरे झालेल्या रुग्णांमध्ये या आजारामुळे लवकर टप्प्यात हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेची गरज भासत असून, त्यातून मोठ्या सामाजिक व आर्थिक अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर पोस्ट-कोविड 'एव्हीएन' संदर्भात राष्ट्रीय पातळीवरील सखोल अभ्यास, प्रभावी आरोग्य सर्वेक्षण आणि धोरणात्मक उपाययोजना राबविण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी मांडले.

## 'किराना परंपरा' मालिकेत उलगडले उस्ताद रजब अली खाँ यांचे सांगीतिक योगदान

### डॉ. अतींद्र सरवडीकर आणि डॉ. चैतन्य कुंटे यांनी केली मांडणी



पुणे (दै. संध्या) :

घराण्यांच्या भिंती उंच होत्या, अशा काळातही स्वतःच्या कव्वालबच्चे परंपरेसह किराणा आणि जयपूर या घराण्यांची गायकी आणि प्रभाव स्वीकारून, आपली वैशिष्ट्यपूर्ण गायनशैली घडविण्याची किमया बुजुर्ग उस्ताद रजब अली खाँ यांनी साध्य केली होती. त्यांनी कंठसंगीताप्रमाणे वाद्यसंगीतातही स्वतःची शिष्यपरंपरा निर्माण केली असल्याचे 'किराना परंपरा' या मालिकेद्वारे विशद करण्यात आले.

डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशन संचालित स्वरमयी गुरुकुलतर्फे 'किराना परंपरा' या मालिकेतील पाचव्या सत्रात उस्ताद रजब अली खाँ यांच्या गायनशैलीविषयीचे विवेचन संगीताचे अभ्यासक डॉ. चैतन्य कुंटे आणि डॉ. प्रभा अत्रे यांचे शिष्य, गायक डॉ. अतींद्र सरवडीकर संगीताचे विद्यार्थी आणि जिज्ञासू रसिकांसमोर केले. कव्वालबच्चे, किराना आणि जयपूर-अत्रौली अशा तीन परंपरांतील गायकीचा संगम घडवणारे गायक असा उस्ताद रजब अली खाँ यांचा सन्मानपूर्वक उल्लेख सांगीतिक क्षेत्रात केला जातो. या पार्श्वभूमीवर डॉ. सरवडीकर आणि डॉ. कुंटे यांनी संशोधन आणि उपलब्ध ध्वनिमुद्रिकांच्या साह्याने उस्ताद रजब अली खाँ यांचे सांगीतिक योगदान उलगडले. शिवाजीनगर येथील स्वरमयी गुरुकुल सभागृहात कार्यक्रम झाला.

फाऊंडेशनचे कार्यक्रम दिग्दर्शक प्रसाद भडसावळे, डॉ. भारती एम. डी., प्रसिद्ध गायिका कल्पना झोकरकर, तबलावादक पांडुरंग मुखडे यावेळी उपस्थित होते.

डॉ. चैतन्य कुंटे म्हणाले, उस्ताद रजब अली यांनी त्यांच्या काळात विशेष प्रचलीत आणि लोकप्रिय असलेल्या गायकींचे मर्म समजून, त्यातील आवडलेले अंश आत्मसात केले. त्या काळात घराण्यांची शिस्त कडक होती. गुप्तता राखली जात असे. घराण्याच्या शुद्धतेच्या विशिष्ट कल्पना होत्या. पण रजब अली यांनी तशाही परिस्थितीत जयपूर आणि किराणा घराण्यांची गायनशैली जाणून घेत, त्यातील काही अंश आपल्या गायनात मिसळण्याचे धैर्य दाखवले आणि स्वतःची संमिश्र गायकी मान्यताप्राप्त करून दाखवली.

डॉ. अतींद्र सरवडीकर म्हणाले, सुराकडे पाहण्याची दृष्टी रजब अली यांनी आत्मसात केली होती. उस्ताद अल्लादियाखांसाहेब आणि रजब अली, यांच्यात स्पर्धात्मक चुरस जरूर होती, पण मनातून दोघांनाही परस्परांविषयी आदर, सन्मान होता. एकमेकांचे श्रेष्ठत्व ते मानत होते. रजब अली यांच्या संगीतसाधनेला आध्यात्मिक बैठकही होती. कंठसंगीताप्रमाणेच ते तबला, जलतरंग आणि बीनवादक होते. लता मंगेशकर यांनाही रजब अली यांच्या गायकीविषयी आत्मीयता होती. त्यांच्या बंदिशी नंतर चित्रपटगीतांमध्येही आलेल्या आढळतात.

बहादुरी तोडी, पूरिया, नटकामोद आदी रागांमधील ध्वनिमुद्रणही यावेळी ऐकवण्यात आले.

विदुषी कल्पना झोकरकर यांनीही काही आठवणींना उजाळा दिला. वडील कृष्णराव मुजुमदार यांच्याकडून उस्ताद रजब अली यांच्याविषयी अनेक आठवणी, किस्से समजले. उस्ताद आमीर खाँ आमच्या घरी नेहमी येत असत. त्यांच्याकडूनही अनेक वैशिष्ट्ये समजली, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रसाद प्रदर्शन प्रसाद भडसावळे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## कार व ट्रकचा भीषण अपघात : निमोणेतील बापलेकींसह मामाचा ही जागीच मृत्यू

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील नागरगावच्या हद्दीत न्हावरे - रस्त्यालगत नलगे वस्ती येथे कार व ट्रकचा भीषण अपघात होऊन बाप लेकींसह मामाचा जागीच मृत्यू झाला आहे तर या अपघातात दोन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत.पवन राजहंस काळे,आराध्या पवन काळे व बाळासाहेब नागवडे असे तिघा मृतांची नावे आहेत. निमोणे (ता. शिरूर ) येथील पवन काळे व त्यांचे मेव्हणे बाळासाहेब नागवडे हे कार मधून बाहेरगावी चाललेले असताना न्हावरे - चौफुला रस्त्यालगत नलगे वस्ती येथे मध्यरात्रीच्या सुमारास समोरून आलेल्या ट्रकला काळे यांच्या कारची समोरासमोर धडक बसून अपघात झाला.यावेळी दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान होऊन कार मध्ये असलेले पाचही जण गंभीर जखमी झाले.दरम्यान नागरिकांनी जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले मात्र या अपघातामध्ये पवन राजहंस काळे ( वय ३४ वर्षे ), आराध्या पवन काळे ( वय ९ वर्षे )यांसह पवन काळे यांचे मेहुणे बाळासाहेब नागवडे (वय ३८ वर्षे ) तिघे (रा. निमोणे ता. शिरुर जि. पुणे ) यांचा जागीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.सदर दुर्दैवी घटनेमुळे निमोणे गावात शोककळा पसरली असून काळे कुटुंब हे गावातील सामाजिक कार्यामध्ये नेहमी सक्रिय तसेच परिसरात सर्वपरिचित कुटुंब म्हणून ओळखले जात ,अचानक झालेल्या या दुर्दैवी घटनेने ग्रामस्थांना मोठा धक्का बसला असून गावात शोककळा पसरली आहे.

## मातृ-पितृ पूजनातून संस्कारांची जपणूक; शहीदांना भावपूर्ण आदरांजली

आळंदी (दैनिक संध्या) : ध्यास फौंडेशन संचलित महर्षी वाल्मिकी बालक मंदिर, महर्षी वाल्मिकी विद्यावर्धिनी तसेच डॉ. माधवराव सानप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे शनिवारी 'मातृ-पितृ उत्सव' आणि शहीदांना आदरांजली कार्यक्रम भावनिक व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुलवामा हल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संतश्रेष्ठ माऊलींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी संस्थेच्या संचालिका अक्षता कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. शिक्षक-पालक संघाचे प्रतिनिधी, पालकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत समारंभानंतर संचालिका कुलकर्णी यांनी प्रस्तावनेत भारतीय संस्कृतीतील मातृ-पितृ पूजनाची परंपरा अधोरेखित करत राष्ट्ररक्षणासाठी बलिदान देणाऱ्या जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. पुढील वर्षी 'माता-पिता मेळावा' आयोजित करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे औक्षण करून त्यांच्या चरणी नम्र अभिवादन केले. याप्रसंगी पालक प्रतिनिधी ॲड.निलेश चौधरी यांनी सशक्त कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. पत्रकार दिनेश कुऱ्हाडे व उद्धव राखुंडे यांनी विद्यार्थ्यांना मातृ-पितृ पूजनाच्या शुभेच्छा देत संस्कारमूल्यांचे महत्त्व सांगितले. उत्सवावेळी पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची झळाळी पाहायला मिळाली. संपूर्ण परिसरात प्रेम, आदर आणि संस्कारांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची जपणूक होत देशभक्तीची भावना अधिक दृढ झाल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडल्याबद्दल शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

## थकीत पाणीपट्टी,घरपट्टी तात्काळ भरा : अन्यथा नळ कनेक्शनवर हातोडा

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील अष्टविनायक महामार्गावर असलेली एक मोठी ग्रामपंचायत असलेल्या कवठे येमाई येथे आज ग्रामपंचायतीत करवसुली संदर्भात विचारणा व नळाच्या पाण्याच्या अडचणी संदर्भात गावठाणातील महिला ग्रामपंचायत कार्यालयात तक्रार घेऊन आलेल्या पाहावयास मिळाल्या. मागील काही दिवसांपासून गावठाण पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.याबाबत सरपंच मनीषा पांडुरंग भोर व नवीन ग्रामपंचायत अधिकारी पूनम थोरात चितळकर यांना विचारण्यासाठी महिला भर दुपारी ग्रामपंचायत कार्यालयात आल्या होत्या. पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी जवळील वीज पुरवठा विस्कळीत असल्याने गावठाण पाणी पुरवठा करण्यात मोठी अडचण येत असल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाकडून सांगण्यात आले.आमचे स्थानिक प्रतिनिधी यांनी या महत्वपूर्ण समस्येबाबत तात्काळ महावितरणचे टाकळी हाजी शाखा अभियंता नितीन मुरकुटे यांना याबाबत कल्पना दिली. मुरकुटे यांनी आजच तेथील वीजपुरवठा सायंकाळी ४ पर्यंत सुरळीत सुरु होईल असे आश्वासन दिल्याने उद्यापासून गावठाणात योग्य त्या दाबाने नक्कीच पाणीपुरवठा होईल असा विश्वास ग्रामपंचायत कर्मचारी अजित शिंदे यांनी दिला. तर आमच्या प्रतिनिधीने ग्रामपंचायतीस कर रुपी येणे असलेली थकीत पाणीपट्टी,घरपट्टी बाबत विचारणा केली असता निम्मा फेब्रुवारी महिना संपला तरी जेमतेम ४० टक्केच वसुली झाल्याची माहिती मिळाली. तसेच वसुली अभावी अनेक समस्यांना ग्रामपंचायतीस तोंड द्यावे लागत असल्याची ही माहिती मिळाली.

# सासवड सांस्कृतिक मंडळाच्या किल्ले स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**सासवड (दै. संध्या) :**

ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने सासवड सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक किल्ले स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा रविवारी (दि. १५) उत्साहात पार पडला. शहरातील पुरातन चांगावटेश्वर मंदिराच्या पवित्र प्रांगणात हा सोहळा संपन्न झाला असून, यावेळी बाल मावळ्यांच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद ओसंडून वाहत होता.

आमदार संजय जगताप यांच्या अध्यक्षतेखाली चालणाऱ्या या मंडळाने गेली दोन दशके ही परंपरा अखंडितपणे सुरू ठेवली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून नवी पिढी गड-किल्ल्यांच्या इतिहासाशी जोडली जात आहे. यंदाही या स्पर्धेला सासवड शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

बक्षीस वितरण कार्यक्रमात इतिहास संशोधक महेंद्र नवले आणि



अक्षता नवले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी इतिहास, प्राचीन मंदिरांचे महत्त्व आणि मोडीलिपी या विषयांवर सखोल माहिती देऊन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ईश्वरी बोरुडे हिने छत्रपती शिवशंभूंच्या स्मरणाची दिलेली 'गारद' वातावरण शिवमय करून गेली. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला दरवर्षी ग्रामीण संस्थेच्या वतीने चॉकलेट बॉक्स देण्यात येतो. सुमारे पाच हजार मुलांना हा खाऊ उपलब्ध करून देणाऱ्या ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांचे यावेळी विशेष आभार मानण्यात आले.

या गटात ओंकार गिरमे याने प्रथम क्रमांकावर मोहोर उमटवली. द्वितीय क्रमांक तन्मय म्हेत्रे, तृतीय ओम झेंडे, चतुर्थ स्वराज पवार, तर पाचवा क्रमांक साई टिळेकर याने पटकावला. विनीत गिरमे याला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. विजेत्यांना ट्रॉफी, प्रशस्तीपत्रक आणि ३ हजार ते ५०० रुपयांपर्यंतची रोख बक्षीसे प्रदान करण्यात आली.

सामूहिक गटात श्री काळभैरवनाथ दुर्गसेवक मंडळाने प्रथम क्रमांकाचा मान मिळवला. द्वितीय क्रमांक गुरुकुल करिअर अकॅडमी, तृतीय शिवशंभो ग्रुप, चतुर्थ क्रमांक संयुक्तपणे महात्मा फुले मित्र मंडळ व शंभूराजे मंडळाने मिळवला. पाचवा क्रमांक श्रीमंत नेताजी मित्र मंडळ व साईनाथ सार्वजनिक मित्र मंडळाला देण्यात आला. स्वराज बालमित्र मंडळाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या गटातील विजेत्यांना ११ हजार ते १५०० रुपयांपर्यंतची रोख बक्षीसे व ट्रॉफी देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी केले, तर प्रा. अमित पावशे यांनी स्वागत केले. यावेळी संजय काटकर, अमित पवार, संदीप इनामके, स्वानंत लोमटे, सागर घाटगे, प्रा. मनीषा कामठे, प्रा. स्नेहा शेवाळे, दीपक जगताप, जीवन कड, अनिल गद्रे, प्रा. संदीप टिळेकर, संदीप राऊत, परशुराम देशमुख, प्रसाद जगताप आणि सुनील कामथे यांसह नागरिक व दुर्गप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाशिवरात्रि निमित्त ५० किलो खिचडीचे वाटप

**कवठे येमाई (दै. संध्या) :**

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावठाणातील ऐतिहासिक जागृत देवस्थान असलेल्या श्री महादेव मंदिरात महाशिवरात्रि उत्सव विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत असून सकाळपासूनच भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झालेली पाहावयास मिळाली. दरम्यान काही वर्ष या गावात राहून व्यवसाय करणारे व सध्या शिरूर येथे वास्तव्यास असणारे संदीप रुणवाल व कुटुंबीयांनी मागील १४ वर्षांपासून त्यांनी गावठाणातील महादेव दर्शनासाठी आलेल्या सर्व भाविक भक्तांना सुरु केलेली खिचडी प्रसाद वाटप परंपरा आज १४ व्या वर्षी ही जपली आहे. याच बरोबर भाविक भक्तांना भक्तांना त्यांच्याकडून केळी वाटप ही करण्यात येत असून त्यांनी सुरु ठेवलेल्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मिठूलाल बाफणा,नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या कांचनताई राजेश सांडभोर,लक्ष्मण नाना मुखेकर,रामदास माळवदे,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर,ग्रामपंचायत सदस्य प्रवीणकुमार बाफणा व ग्रामस्थांनी कौतुक केले आहे. तर जोपर्यंत प्रभू महादेव यांच्या कृपा आशीर्वादाने खिचडी वाटप उपक्रमक सुरु ठेवता येईल तो पर्यंत विनाखंड हा सेवाभावी उपक्रम सुरूच ठेवणार असल्याचे दिपक रुणवाल यांनी सांगितले.

## युवराज काकडे यांच्याकडून ज्येष्ठ नागरिक कार्डचे वाटप

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**

हवेली तालुका पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य युवराज हिरामण काकडे यांनी निवडून आल्यावर समाजाभिमुख उपक्रम राबवत ज्येष्ठ नागरिक ओळखपत्रांचे (Senior Citizen Card) वाटप करून आपल्या कामाची धडाकेबाज सुरुवात केली. थेऊर येथे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांना सन्मानपूर्वक कार्डांचे वितरण करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले हे ओळखपत्र मिळाल्याने ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



यावेळी बोलताना युवराज काकडे यांनी सांगितले की, "ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या समस्या सोडविणे आणि त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे." पुढील काळात आरोग्य शिबिरे, प्रलंबित पेन्शन प्रकरणे तसेच ग्रामविकासाशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास अनेक जेष्ठ नागरिक उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत नव्या प्रतिनिधींचे अभिनंदन केले.

आरोग्यदूत युवराज काकडे यांनी एक महिन्यापूर्वी आळंदी, कुंजीरवाडी, थेऊर, कोलवडी, मांजरी, आव्हाळवाडी या गावांत शिबिर आयोजन केले होते त्यामध्ये ५०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदवला होता. थेऊर व कुंजीरवाडी या गावांचे कार्ड वाटप पूर्ण झाले आहे.

कोलवडी, मांजरी व आव्हाळवाडी या गावांचे कार्ड वाटप, जिल्हा परिषद सदस्य कोमल संदेश आव्हाळे व पंचायत समिती सदस्य सुषमाताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच होणार असल्याचे आरोग्यदूत युवराज काकडे यांनी सांगितले.

## बारामतीत होमगार्ड जवानाला मारहाण

**प्रशासनाची शून्य सहनशीलता धोरणाची घोषणा**



**बारामती (दै. संध्या) :**

बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक 70/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 132, 121(1), 115(2), 351(2)(3), 352 प्रमाणे आरोपी विकास दादा लोंढे,रा. अनंतनगर आमराई,ता. बारामती जि.पुणे याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दिनांक 15/02/2026 रोजी महाशिवरात्री यात्रेनिमित्त श्री स्वामी समर्थ मंदिर,बारामती येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असताना वाहतूक नियंत्रण व गर्दी नियमनासाठी होमगार्ड जवान सिंध्दार्थ भारत शिंदे हे अधिकृत गणवेशात व नेमप्लेटसह शासकीय कर्तव्य बजावत होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार बॅरेकेटींगमधून कोणत्याही वाहनास प्रवेशबंदी करण्यात आलेली असताना आरोपीने जाणीवपूर्वक मोटारसायकल आत नेण्याचा प्रयत्न केला. त्यास नियम समजावून सांगितल्यावर आरोपीने शासकीय कर्मचाऱ्यावर अश्लील शिवीगाळ,धमकी देत प्रत्यक्ष मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. सार्वजनिक ठिकाणी वर्दीधारी कर्मचाऱ्यावर हात उगारणे ही अत्यंत गंभीर व कायद्याला आव्हान देणारी बाब असून याकडे पोलीस प्रशासन अत्यंत गांभीर्याने पाहत आहे.होमगार्ड दल हे महाराष्ट्र पोलीस दलाचे पूरक सहाय्यक बल असून 1962 पासून देश व राज्याच्या आपत्कालीन,नैसर्गिक आपत्ती,कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक बंदोबस्ताच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. होमगार्ड जवान हे स्वयंसेवी तत्त्वावर नागरिकांच्या सुरक्षेसाठी रात्रंदिवस कार्यरत असतात. कायद्यानुसार होमगार्ड हे "Public Servant" या श्रेणीत मोडतात व त्यांच्या शासकीय कर्तव्यात अडथळा आणणे, त्यांच्यावर बलप्रयोग करणे किंवा धमकी देणे हे दंडनीय व गंभीर गुन्हे आहेत.बारामती शहर पोलीस प्रशासन स्पष्टपणे जाहीर करते की,शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकारी किंवा होमगार्ड जवानांच्या वर्दीवर हात घालणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही.अशा प्रवृत्तीवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.कायद्यापुढे सर्व समान असून शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध शून्य सहनशीलतेची भूमिका अवलंबली जाईल.

> नागरिकांनी सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस व होमगार्ड दलास सहकार्य करावे. आपत्कालीन सेवा देणाऱ्या जवानांचा सन्मान राखणे ही प्रत्येक जबाबदार नागरिकाची कर्तव्यभावना आहे.प्रशासन समाजविघातक कृत्यांना कधीही माफी देणार नाही व कायद्याच्या चौकटीत राहून कठोर शासन करेल.

## आगरवाडी व पठारवाडी भागातील विद्युत पुरवठा सुरळीत



**चाकण (दै. संध्या) :**

दोन दिवसांपूर्वी चाकण नगरपरिषद हद्दीतील पठारवाडी, आगरवाडी व राक्षेवाडी या ठिकाणचे सात मुख्य विद्युत खांब तुटले होते. त्यामुळे या भागातील बत्ती गुल झाली होती. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी महावितरण कडून हे काम मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केल्याने या भागातील वीजपुरवठा पूर्ववत झाला आहे. या भागातील नागरिकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना वारंवार संपर्क करून नवीन विद्युत उभे करण्यास सांगितले होते. परंतु काम करताना तेथील काही स्थानिक शेतकऱ्यांच्या अडचणी होत्या. त्या अडचणी सोडवून काम मार्गी लावण्यात यश आले आहे. त्याठिकाणी प्रत्यक्ष चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेवक अनिल लोहकरे आदींनी अधिकाऱ्यांना हे काम लवकरात लवकर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या भागातील विद्युत पुरवठा तातडीने मार्गी लावला आहे.

# महाशिवरात्रीनिमित्त पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सनातन संस्थेच्या वतीने व्यापक स्तरावर धर्मप्रसार !

**५३ हून अधिक ठिकाणी ग्रंथ आणि सात्त्विक उत्पादन प्रदर्शनांचे आयोजन; जिज्ञासूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**पुणे (दै. संध्या) :**

महाशिवरात्रीचे औचित्य साधून पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात सनातन संस्थेच्या वतीने भव्य स्तरावर धर्मप्रसार करण्यात आला. शिवभक्तांना शिवाची शास्त्रोक्त माहिती मिळावी आणि त्यांच्यामध्ये धर्माभिमान जागृत व्हावा, या उद्देशाने 53 हून अधिक ठिकाणी ग्रंथ प्रदर्शन, सात्त्विक उत्पादने आणि धर्मशिक्षण फलक लावून व्यापक अभियान राबवण्यात आले.



शिवपिंडीला अर्धप्रदक्षिणा का घालावी, बेल कसा अर्पण करावा, याविषयी फलक आणि हस्तपत्रकांद्वारे भाविकांचे प्रबोधन करण्यात आले. ओंकारेश्वर (शनिवार पेठ), मृत्युंजयेश्वर (कोथरूड), धायरेश्वर, नीलकंठेश्वर (हडपसर), यांसह अनेक प्रमुख मंदिरांमध्ये ही प्रदर्शने लावण्यात आली होती. विविध ठिकाणाच्या महादेव मंदिर कक्षाला आणि ग्रंथप्रदर्शनाला विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भेटी दिल्या.

यामध्ये राज्यसभा खासदार प्रा. डॉ. (सौ.) मेधा कुलकर्णी, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नगरसेविका सौ. मनिषा योगेश चिंचवडे आणि सोबत श्री. योगेश चिंचवडे, भाजप नगरसेवक श्री. श्रीकांत जगताप, भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, नगरसेविका मंजुश्री खर्डेकर आणि मंचरच्या प्रथम नगराध्यक्षा राजश्री गांजाळे यांचा समावेश होता. तसेच, वारकरी शिक्षण संस्थेचे संचालक ह.भ.प. बुवा पानसरे महाराज, आसामच्या कामाख्या देवी मंदिराचे मुख्य पुरोहित विजयघर शर्मा आणि पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर राहुल जाधव यांनीही उपस्थिती लावून उपक्रमाचे कौतुक केले. ठिकठिकाणी प्रवचने आणि फलक लेखनाद्वारे भगवान शिवाचा महिमा सांगण्यात आला.

महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे,
कार्यकारी अभियंता, उजनी जलविद्युत विभाग इंदापूर जिल्हा-पुणे.
दुरध्वनी क्रमांक ०२१११-२९५७९४
ई-मेल - ujjanihydroindapur@yahoo.in.
ई-निविदा सुचना क्र. १५ सन २०२५-२०२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उजनी जलविद्युत विभाग इंदापूर जि-पुणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम परवानाधारक विद्युत निविदाकाराकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिक्षक अभियंता, उभारणी मंडळ कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| कामाचे नांव | : | पूरंदर उपसा सिंचन योजनेच्या १३२/३३ के.व्ही. पुरंदर टप्पा क्र.१ ते ४. ३३/६.६ के.व्ही. टप्पा ५ व २२/०४१५ के.व्ही. टप्पा ६ येथील कळयंत्र आवार व पारेषण वाहीणी संचलन व देखभालीसाठी एक वर्ष कालावधीसाठी मनुष्यबळाचा पुरवठा करणेचे काम |
| जिल्हा | : | पुणे |
| निविदा किंमत रुपये | : | १,१४,१७,१०४/- |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | : | दिनांक १६/०१/२०२६ ते दिनांक २३/०१/२०२६ |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | : | दिनांक २७/०१/२०२६ |

जा.क्र. उजविवि/लेशा-२/निविदा/१५६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर,
दिनांक :- ५/२/२०२६

सही/-
(प्र.पुं. बिराडे)
कार्यकारी अभियंता,
उजनी जलविद्युत विभाग,
इंदापूर

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C5855

## थोडक्यात पण महत्वाचे...



### रामचरित सत्संगचा वर्धापनदिन साजरा

यमुनानगर निगडी (दैनिक संध्या) : यमुनानगर ज्येष्ठ नागरिक संघात रामचरित सत्संग सुरू होऊन एक वर्ष पूर्ण झाले. रामचरित सत्संग पहिला वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त ह. भ. प. एकनाथ उगले यांना आमंत्रित करण्यात आले. श्री आप्पा कुलकर्णी यांनी त्यांचा परिचय करून दिला. ह. भ. प. एकनाथ उगले यांचे सत्संग या विषयावर सुश्राव्य असे प्रवचन झाले. प्रवचननंतर श्री चंद्रकांत सुर्वे यांनी त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमात श्री चंद्रकांत सुर्वे श्री दत्तात्रय गुंजाळ श्री गजानन ढमाले श्री गोविंद खवासखान श्री आप्पा कुलकर्णी श्री शरद इनामदार श्री विजय पंडित श्री वसंत पांडे श्री नंदू सोनवणे श्री अशोक नहार श्री बाळासाहेब चव्हाण श्री रमेश कावळे श्री जयंत बरशेट्टी श्री संभाजी डोके श्री प्रदीप मुजुमदार श्री विलास रसाळ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन श्री दत्तात्रय गुंजाळ श्री चंद्रकांत सुर्वे श्री गोविंद खवासखान यांनी केले. अल्पोहार व चहापानानंतर पसायदान होऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.



### ज्येष्ठ नागरिक महासंघाचे सहसचिव म्हणून श्री. गजानन ढमाले यांची निवड

काळेवाडी, चिंचवड (दैनिक संध्या) : ज्येष्ठ नागरिक महासंघ पिंपरी चिंचवड शहर नवीन कार्यकारिणी 2026 ते 2028 यांचा पदग्रहण शपथविधी निवडणूक प्रमाणपत्र कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी 28 प्रतिनिधींनी शपथ घेतली. ज्योतिबा मंगल कार्यालय काळेवाडी येथे सकाळी दहा वाजता हा शपथविधी कार्यक्रम सुरू झाला. कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड शहर जेष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा श्रीमती वृषाली ताई मरळ परिवारातर्फे करण्यात आले. यमुना नगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष गजानन ढमाले यांचा सहसचिव पदी बहुमताने निवड झाल्याबद्दल शपथविधीनंतर शाल, श्रीफळ, महासंघाचे आय कार्ड व बहुमताने सहसचिव या पदावर बहुमताने यथोचित रित्त्या निवड झालेली आहे ,याचे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक संघ यमुनानगर सदस्यांनी याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

### श्रीकर परदेशी किंवा तुकाराम मुंढे यांची आयुक्तपदी नियुक्ती करा – मारुती भापकर



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कथित गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून शहरात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे. सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन दिले आहे. महापालिकेतील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी श्रीकर परदेशी किंवा तुकाराम मुंढे यांना आयुक्तपदी नियुक्त करा अशी मागणी भापकर यांनी केली आहे. मारूती भापकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, २०१७ ते २०२२ या कालावधीत तसेच २०२२ ते २०२६ या प्रशासकीय राजवटीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला आहे. विशेषतः विविध कंत्राटे, विकास प्रकल्प, स्मार्ट सिटी उपक्रम, टीडीआर व्यवहार, सिमेंट रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य विभाग, सुरक्षा व स्वच्छता कंत्राटे यामध्ये अनियमितता झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दरम्यान, नुकत्याच घडलेल्या एका घटनेचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, एका महिला उपायुक्तांच्या केबिनमध्ये घुसून कंत्राटाच्या अटी बदलण्यासाठी दबाव टाकण्यात आल्याची तक्रार संबंधित अधिकाऱ्यांनी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. या प्रकरणामुळे महापालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे. भापकर यांनी निवेदनात नमूद केले की, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या २०२६ च्या निवडणुकीत पुन्हा बहुमत मिळाल्यानंतर सत्ताधाऱ्यांकडून सत्तेचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहराच्या सुनियोजित आणि दर्जेदार विकासासाठी कठोर व पारदर्शक प्रतिमेचे अधिकारी आयुक्त म्हणून नेमावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी त्यांनी डॉ. श्रीकर परदेशी किंवा तुकाराम मुंढे यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे.

### पुणे जिल्ह्यात चार तालुक्यांत पीएमआरडीएकडून 10 नवे रस्ते उभारणार

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील चार तालुक्यांत नव्याने दहा रस्ते उभारण्यात येणार आहे. त्यापैकी पिंपरी- चिंचवड शहरालगत असलेल्या हवेली, मावळ, शिरूर आणि खेड तालुक्यात सर्वाधिक रस्ते तयार केले जाणार आहेत. पीएमआरडीएच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या या रस्त्यामुळे नागरीवस्तीमधील दळणवळण वाढीला मदत होणार असून, तालुक्यातील शेतकरी, कामगारांना याचा फायदा होणार असून, पर्यटन वाढीसाठी हा महत्त्वाचा टप्पा असणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत नऊ तालुक्यांचे कामकाज चालते. या तालुक्यातील पायाभूत सुविधा उभारण्याचे काम प्राधिकरणातर्फे करण्यात येते. यापूर्वी विविध तालुक्यात रस्ते उभारण्यात आले होते. आता पुन्हा नव्याने दहा रस्त्यांचे नियोजन असून, त्या अनुषंगाने निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. येत्या आठवडाभरात या निविदांवर कार्यवाही सुरु होणार आहे. कार्यआदेश निघाल्यानंतर प्रत्यक्षात काढण्यात येणार आहे. पीएमआरडीएच्या अंतर्गत हवेली, खेड, शिरुर, मावळ आणि पीएमआर अंतर्गत ही कामे करण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित ठेकेदाराला साधारण दहा वर्षे देखभाल दुरुस्तीची जबाबदारी राहणार आहे. या चार तालुक्यातील अंतर्गत तसेच, महत्त्वाच्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. नागरीवस्ती, शेतकरी यांना आवश्यक असलेल्या आणखी काही रस्त्याची मागणी देखील स्थानिक पातळीवर करण्यात आली होती. त्यानुसार स्थानिक आमदार यांच्या मागणीनुसार या रस्त्याची कामे होणार आहेत.

# बंजारा सेवा संघ मावळच्यावतीने संत सेवालाल जयंती उत्साहात साजरी



**तळेगाव दाभाडे (दै. संध्या) :** बंजारा सेवा संघ मावळच्यावतीने संत गुरु सेवालाल महाराजांची जयंती पागडी रथयात्रा, भोग, प्रतिमा पूजन, सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. तळेगाव दाभाडे नगरपरिषदेतही संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तळेगाव दाभाडे येथील सुशीला मंगल कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी, नगरपरिषद, जिजामाता चौक, मारुती मंदिर चौक ते सुशीला मंगल कार्यालया दरम्यान भव्य पागडी रथयात्रा काढण्यात आली. या रथयात्रेत मावळ तालुक्यातील बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी आयोजित बंजारा समाज मेळाव्याचे उद्घाटन निवृत्त जिल्हा न्यायाधीश नामदेव चव्हाण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक सुधाकर शेळके होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष संतोष दाभाडे उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते राहुल खळदे, बंजारा सेवा संघ मावळचे संस्थापक अध्यक्ष हिरा रतू जाधव, अध्यक्ष महादेव राठोड, तळेगाव नगरपरिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी ममता चव्हाण – राठोड, सामाजिक कार्यकर्ते नितीन मुन्हे, ग्रामविकास अधिकारी परमेश्वर राठोड, वन अधिकारी ज्ञानेश्वर चव्हाण, डॉ. बी एस पवार, शंकर खेतावत, शोभा राठोड, विजयालक्ष्मी राठोड, जयश्री खेतावत, मीराबाई राठोड, लक्ष्मण नाईक, संस्थेचे उपाध्यक्ष चंदू राठोड, उपाध्यक्ष देसू राठोड, जयराम चव्हाण, शंकर पवार, खजिनदार राजू पवार, सचिव अतुल चव्हाण, विठ्ठल जाधव, विठ्ठल राठोड, यंका राठोड, शेट्टी चव्हाण, राम जाधव, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना संतोष दाभाडे म्हणाले, की बंजारा समाज हा मेहनत करून जीवन जगणारा समाज आहे. मावळच्या जडणघडणीत या समाजाचे मोठे योगदान आहे. या समाजाला न्याय मिळावा. संस्कृती जपण्याचे काम या समाजाने केले. समाजाला जी मदत लागेल ती करू.

सुधाकर शेळके म्हणाले, की अनेकजण उच्चशिक्षित असून, मोठ्या अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांचे प्रश्न सोडविण्याला कायम प्राधान्य असणार आहे. नामदेव चव्हाण म्हणाले, की आपल्या समाजाची प्रगती व्हावी, म्हणून आपण सर्वांनी एकमेकांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. संत सेवालाल महाराजांच्या विचारातून प्रेरणा घ्यायला हवी. शिक्षण महत्त्वाचे आहे, त्यामुळे आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्या. हिरा जाधव यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, की संत सेवालाल महाराजांच्या जयंतीदिनी शासकीय सुट्टी जाहीर करावी. सूत्रसंचालन महादेव राठोड यांनी, तर आभार लखन जाधव यांनी मानले.

## सिंहगड एक्सप्रेसमध्ये महिलांसाठी स्वतंत्र डब्याची मागणी

**■ गर्दी, वाद आणि असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर प्रवासी संघटनेचे मध्य रेल्वेकडे निवेदन**

**पिंपरी (दै. संध्या) :** पुणे-मुंबई रेल्वे मार्गावर धावणाऱ्या सिंहगड एक्सप्रेसमध्ये जागा न मिळाल्याने अनेक तिकीटधारक आरक्षित किंवा मासिक पासधारक डब्यांमध्ये प्रवेश करतात. तसेच, पासधारकांशी वाद घालतात. यामुळे अनेकदा भांडणाचे प्रकार घडतात. याचा त्रास मासिक पासधारक, विशेषतः महिलांना, सहन करावा लागत आहे. त्यामुळे मासिक पासधारक महिलांसाठी स्वतंत्र राखीव डबा देण्यात यावा, अशी मागणी पुणे-मुंबई-पुणे रेल्वे प्रवासी संघटनेने मध्य रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. याबाबत संघटनेने नुकतेच मध्य रेल्वे महाव्यवस्थापक यांना निवेदन दिले आहे. या वेळी संघटनेने डेक्कन क्वीन, प्रगती आणि सिंहगड एक्सप्रेस या गाड्यांमधील मासिक पासधारक डब्यांमध्ये नियमित तिकीट व पास तपासणी व्हावी, यासाठी सह्यांची मोहिमही राबवली. या सह्यांचे निवेदन मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. पुणे-मुंबई दरम्यान धावणाऱ्या डेक्कन क्वीन एक्सप्रेस, सिंहगड एक्सप्रेस, प्रगती एक्सप्रेस या गाड्या दैनंदिन प्रवास करणाऱ्या चाकरमानी, नोकरदार व व्यावसायिक प्रवाशांसाठी जीवनवाहिनी ठरल्या आहेत.

## वयोवृद्धांची फसवणूक करणारा इराणी आरोपी जेरबंद

### पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई




**पिंपरी (दै. संध्या) :** वयोवृद्ध महिला व पुरुषांना पोलीस असल्याचे भासवून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने हातचलाखीने काढून फसवणूक करणाऱ्या रेकॉर्डवरील इराणी आरोपीस गुन्हे शाखा, युनिट दोनच्या पथकाने ठाणे जिल्ह्यातील इराणी वस्ती, अंबिवली येथून ताब्यात घेतले. मोहम्मद सय्यद कंबर अली (वय ४०, रा. स्टार बेकरी जवळ, इराणी वस्ती, अंबिवली, ठाणे) यास १३ फेब्रुवारी रोजी सापळा रचून पकडण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी व त्याचे साथीदार वयोवृद्धांना रस्त्यात अडवून १पोलीस तपास असल्याचे सांगत दागिन्यांची बतावणी करीत असत सुमारे १०० ते १२० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून आरोपींचा ठावठिकाणा निश्चित करण्यात आला. अटकेदरम्यान नातेवाइकांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. मात्र पथकाने धाडसाने कारवाई पूर्ण केली.

आरोपीवर हिंजवडी व देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असून पुढील तपास गुन्हे शाखा, युनिट-२ करीत आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त आयुक्त बसवराज तेली, सारंग आवाड, उपायुक्त डॉ. शिवाजी पवार, सहायक आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या पथकाने केली.

## काळेवाडी परिसरात चेन स्नॅचिंग करणारी टोळी गजाआड



**■ पोलिसांकडून सवासहा लाखांचा मुद्देमाल जप्त**

**पिंपरी (दै. संध्या) :** काळेवाडी परिसरात चैन स्नॅचिंग करणा-या आरोपींना काळेवाडी पोलिसांनी अटक केली. त्यांच्या ताब्यातून तब्बल सहा लाख, पाच हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संजय नरसिंमलू नक्का (वय २९, रा. सोमेश कॉलनी, नांदेड), आदर्श अनिल कामठीकर (वय २५, रा. महावीर चौक, नांदेड) आणि संजू किसन गुडमलवार (वय २४, रा. गुरुद्वारा गेट नंबर दोन जवळ, नांदेड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. काळेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे सूचनेनुसार चैन स्नॅचिंगच्या तपासाकरिता विशेष पथक तयार केले. सहायक पोलीस निरीक्षक वैभव गुरव व पथकाने गुप्त माहिती तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे जालना जिल्ह्यातील व एका गावातून आरोपींना पल्सर मोटारसायकलसह ताब्यात घेतले. सुरूवातीला त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांनी सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपी हे मूळचे नांदेड येथील असून त्यांना जालना येथून अटक करण्यात आली. अटक आरोपींकडून २१.५३० ग्रॅम वजनाचे ३.७९ लाखांचे सोन्याचे मंगळसूत्र, पाच पल्सर व दोन स्प्लेंडर अशा सात मोटारसायकली, दोन मोबाइल हँडसेट व खंजर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींनी काळेवाडी हद्दीत अनेक चैन स्नॅचिंग व वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून सात गुन्हे उघडकीस आले आहेत. पुढील तपास काळेवाडी पोलीस करीत आहेत.

## पिंपळे निलखमध्ये बीआरटी रोडवर ट्रॅव्हल्स बसमुळे वाहतूक कोंडी

**■ जगताप डेअरी चौक ते सांगवी फाटा दरम्यान अपघाताचा धोका वाढला; कारवाईची मागणी**

**पिंपरी (दै. संध्या) :** जगताप डेअरी चौक ते सांगवी फाटा दरम्यानच्या बीआरटी रोडलगत ट्रॅव्हल्स बस मोठ्या प्रमाणावर उभा असतात.

यामुळे वाहतुकीचा मोठा खोळंबा होत असून, अपघाताचा धोका वाढल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. विशेषतः सायंकाळी 5 नंतर ट्रॅव्हल्स बसची मोठी वर्दळ सुरू होत असून, त्यामुळे या मार्गावर वाहनचालकांना अचानक थांबावे लागत आहे. या परिसरात बस रस्त्याच्या कडेला थांबवल्या जात असल्याने मागून येणाऱ्या वेगवान वाहनांना अचानक ब्रेक मारावा लागत आहे. परिणामी, दुचाकीस्वार व चारचाकी वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

अनेकदा या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. ट्रॅव्हल्स चालकांकडून रस्त्याच्या नियमांचे उल्लंघन होत असतानाही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. दररोज कोंडी होते, अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. तरीही प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

## सौरभ चौहानच्या स्मृती प्रित्यर्थ भंडारा डोंगर ट्रस्टला देणगी



**पिंपरी (दै. संध्या) :** सौरभ महेश चौहान याचे ऐन तारुण्यात वयाच्या २१ व्या वर्षी मागील सहा महिन्यांपूर्वी पुण्यात अपघाती निधन झाले. यामुळे त्याच्या कुटुंबावर आणि सवंगड्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला. सौरभ आणि त्याचे मित्र प्रत्येकाचा वाढदिवस एखाद्या सामाजिक उपक्रमाने साजरा करीत असत. सौरभ याने संपूर्ण जीवनात वारकरी संप्रदायाचा वारसा जपला. एकादशीचे दोन्ही उपवास श्रद्धेने करून देहू, आळंदी आणि पंढरपूर या पवित्र स्थळी दर्शनास जात असे. त्याला संतवाङ्मयाबद्दल विशेष आस्था होती आणि अध्यात्मिक साधना त्याच्या जीवनाचा एक भाग होता. सौरभच्या स्मृती प्रित्यर्थ त्याच्या जयंतीचे औचित्य साधून मित्र सौरभ शिंदे, शायान अंसारी, आदित्य गायकवाड, संजय ढोरे, यश जाधव, मयुर तिखे, वेदांत ढोरे, सौरभ बिराजदार, तेजस पाटील, निमेश राघवानी आणि नवी सांगवी येथील सत्ता प्रतिष्ठान यांनी एकत्र येऊन इंदोरी, मावळ येथील श्री विठ्ठल रखुमाई तुकाराम महाराज भंडारा डोंगर ट्रस्टला रुपये २१,०००/- (एकवीस हजार रुपये) देणगी देऊन सौरभ महेश चौहान याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तसेच त्याच्या आत्म्यास शांती लाभो व सद्गती प्राप्त होवो अशी संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज चरणी प्रार्थना केली. नवी सांगवीमध्ये राहणाऱ्या या युवा मित्रांनी आपल्या आवडत्या मित्राच्या स्मृती जतन करण्याचा संकल्प करीत पाश्चात्य संस्कृतीच्या आकर्षणामुळे बिघडलेल्या युवा पिढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचं काम केले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये स्वीकृत नगरसेवक पदासाठी जोरदार रस्सीखेच

**भाजपाचे ७ तर राष्ट्रवादीचे ३ पदांसाठी इच्छुकांची गर्दी; नेत्यांकडे जोरदार फिल्डिंग**




**पिंपरी (दै. संध्या) :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचे स्वीकृत नगरसेवक होण्यासाठी अनेक जण इच्छुक आहेत. त्यासाठी पडद्यामागे हालचालींना वेग आला आहे. पदासाठी इच्छुकांकडून जोरदार फिल्डींग लावली जात आहे. स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी मिळावी, यासाठी पक्षाचे शहराध्यक्ष, खासदार, आमदार तसेच राज्यातील नेतेमंडळींची मनधरणी केली जात आहे.

महापालिकेत यंदा 10 जणांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिली जाणार आहे. त्यात सत्तारूढ भाजपाचे 7 आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या 3 जागा आहेत. त्यासाठी अनेकांची मोर्चेबांधणी केली जात आहे. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, निवडणुकीत माघार घेणारे, माजी नगरसेवक, पराभूत नगरसेवक तसेच, विविध क्षेत्रातील मंडळी या पदासाठी इच्छुक आहेत. भाजपातील अनेक निष्ठावंतांनी या पदावर दावा सांगितला आहे.

भाजपाच्या इच्छुकांकडून पद मिळावे, म्हणून आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्याकडे मनधरणी करण्यात येत आहे. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व इतर मंत्र्यांकडे त्यासाठी शब्द टाकला जात आहे.

पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता असल्याने संधी द्यावी, अशी विनंती केली जात आहे. वेगवेगळ्या माध्यमातून नेतेमंडळींकडे आपल्या नावासाठी गळ घातला जात आहे. शहरातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वीकृत नगरसेवक पदासाठी प्रयत्न चालविले आहेत. ती नावे प्रदेशाध्यक्षांकडून अंतिम केली जाणार आहेत, असे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### पदासाठी मोठ्या रकमेच्या ऑफर ?

स्वीकृत नगरसेवक पदासाठी शहरात मोठी रस्सीखेच पाहायला मिळत आहे. अनेक इच्छुक आपली निवड झाल्याचे सोशल मीडियवार घोषित करून टाकत आहे. त्या पदाला महत्व आल्याने अनेक जण मोठमोठ्या रकमेच्या ऑफर देत आहेत. त्यासाठी पैश्यांची बॅग काहींनी तयार ठेवल्या आहेत. त्यामुळे या पदावरुन राजकारण ढवळून निघण्याची शक्यता आहे, असे एका पदाधिकाऱ्याने खासगीत सांगितले.



## एक महिन्याच्या अंतरात जुने फत्तेश्वर मंदिर परिसरात चार रोहित्र फोडली

■ शेतीपंप तर बंदच, पिके जळण्याच्या मार्गावर

■ घरगुती ग्राहक देखील दहशती खाली अंधारात

**कवठे येमाई (दै. संध्या)**

मागील एका महिन्याच्या अंतरात शिरूर तालुक्यातील कवठे येमाईच्या जुने फत्तेश्वर मंदिर परिसरात घोडनदी किनारी अडचणीच्या भागात असलेले चार १०० केव्हीचे विजेचे ट्रान्स्फार्मर चोरट्यांनी तोडून ,फोडून महावितरणचे मोठे नुकसान तर केलेच आहे पण उन्हाळ्याच्या तोंडावर शेती पंपाचा व घरगुती वीज पुरवठा बंद झाल्याने परिसरातील शेतकरी हवालदिल झाले आहेत.एकतर बिबट्यांची मोठी दहशत,दिवसा ही घडणाऱ्या चोरीच्या घटना यामुळे जीव मुठीत धरून शेतवस्तीवर वास्तव्यास असणारा या भागातील बळीराजा,मागे चोरीस गेलेले दोन रोहित्र अद्याप बसलेले नसताना परवा रात्री त्याच परिसरात असणारे आणखी दोन रोहित्र चोरट्यांनी फोडत त्यातील ऑइल ओतून दिले तर त्यातील कॉपर काढून घेत पोबारा केला. या घटनेमुळे परिसरात शेतीला पाणी देणेच बंद झाले असून घरगुती लाईट ही मागील दोन दिवसांपासून बंद झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये अत्यंत भीतीचे वातावरण पसरले आहे.

या घटने बाबत शिरूर पोलिसांना कळविण्यात आले असून याबाबत तात्काळ तक्रार देण्यात आल्याची माहिती स्थानिक वायरमन सोमनाथ चौरे यांनी दिली. तर चोरट्यांनी फोडलेले १०० केव्ही चे चार ट्रान्स्फार्मर कधी बसवणार ?

याबाबत टाकळी हाजी शाखा अभियंता नितीन मुरकुटे,शिरूरचे उपकार्यकारी अभियंता शरद माने,केडगाव विभाग,बारामती परिमंडळ यांचेकडे यांचेकडे विचारणा केली असता याच भागात मागील काही महिन्यात चोरट्यांनी १२८ ट्रान्सफार्मर फोडून महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान केल्याची माहिती मिळाली.तर या परिसरातील शेतकरी अंधारात राहू नयेत म्हणून घरगुती वीज वापरासाठी असलेला ट्रान्स्फार्मर उद्या सोमवार दि. १६ ला शक्य होईल तेवढ्या जलदगतीने बसविन्यात येत असून तेथील शेती पंपाचे रोहित्र ही शक्य होईल तेवढ्या लवकर बसविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे केडगाव विभागाचे कार्यकारी अभियंता विकास आल्हाट यांनी सांगितले.

वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी पोलीस पोलीस प्रशासनाने गावोगावी ग्रामसुरक्षा दल सक्रिय करावे.दलातील जवानांना बरोबर घेत पोलिसांनी रात्री ११ च्या पुढे योग्य त्या ठिकाणी नाकाबंदी करून तपासणी केल्यास वाढत्या चोऱ्यांच्या घटनांना नक्कीच आळा बसेल.असा विश्वास युवा क्रांती फाउंडेशन राष्ट्रीय किसान विकास मंच चे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुभाष शेटे यांनी व्यक्त केला आहे.

# शेवटच्या क्षणापर्यंत लढणार : मनोज जंरागे पाटील

**भिगवण (दै. संध्या)**




आम्ही आरक्षणाकरिता लढलो व बऱ्यापैकी आरक्षण पदरात टाकून घेतले, म्हणूणच, आमच्या लेकरांना बरच काही मिळालं. आज शरीर साथ देत नसले तरी शेवटच्या क्षणाकरिता मी लढणार आहे. मात्र, तुम्ही सर्वांनी याकरिता साथ द्यावी व वेळ येईल तेव्हा पाठीशी उभे रहावे, अशी गंभीर साद संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी भिगवण येथील मराठा बांधवांना घातली. अखिल भारतीय मराठा महासंघ भिगवण शाखा व छत्रपती शिवराय सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त आयोजित राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेच्या उद्‌घाटन प्रसंगी उद्‌घाटक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिगवण ग्रामपंचायतीचे सरपंच गुराप्पा पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी मंत्री दत्तात्रय भरणे तर, प्रायोजक प्रतिनिधी म्हणून भिगवण येथील श्रीनाथ पतसंस्थेचे चेअरमन पराग जाधव, शेटफळ गढे येथील गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर व सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव उर्फ माऊली भोसले, हॉटेल आयर्न अँड लॉजिंग तसेच हॉटेल विहान व रेष्टोबार चे संचालक संदीप शेठ वाकसे तसेच मदनवाडी येथील हॉटेल विश्वजीत व व्यंकटेश लॉन चे मालक नानासाहेब बंडगर हे यावेळी उपस्थित होते. जरांगे पुढे म्हणाले की, अतिवृष्टीच्या काळात माझा शब्द पाळून भरणे मामांनी खूप चांगले कार्य केले. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी निश्चितच काहीतरी चांगलं करतील अशी त्यांचेकडून अपेक्षा व्यक्त करताना शेतकरी कर्जमाफीचा प्रश्न मामांनी लवकर सोडवावा अशी अपेक्षा त्यांनी केली. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजींनी शेतकऱ्यांना कर्जमाफी केली. शेतकऱ्यांकडे बघण्याची महाराजांची दृष्टी चांगली होती, तर मग शासन का कर्जमाफी करू शकत नाही? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय जून पर्यंत ताटकळत न ठेवता एप्रिलमध्येच तो मार्गी लावावा, अशी विनंतीही जरांगे यांनी यावेळी केली.

व्याख्यानमालेसारखे दुसरे कोणतेही प्रबोधन असू शकत नाही. आजच्या तरुणांची विमनस्क मनस्थिती पाहिली तर, अशा प्रकारच्या व्याख्यानमाला होणे गरजेचे आहे आणि त्यात तरुणांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे मत दत्तात्रय भरणे यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले.

शिवजयंती निमित्त असणाऱ्या ह्या उपक्रमाचे कौतुक करून गावचे सरपंच गुराप्पा पवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महासंघाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे इंदापूर तालुका कार्याध्यक्ष अमोल कांबळे यांनी जरांगे पाटलांच्या आरक्षण लढ्याला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. महासंघाचे मार्गदर्शक मानसिंगराव जाधव, प्रकाशबापू ढवळे, प्रा. रामदास झोळ, पद्माकर माडगे, डॉ. जयप्रकाश खरड, अजितराव रणदिवे, राजेंद्र धांडे, प्रकाश बापू ढवळे, अर्जुनाबापू शिरसट, डी. एन जगताप, पराग जाधव, विकास वाघ, डॉ . निंबाळकर, भरत मोरे, डॉ. संजय भोसले, संजय जगताप, अनिलराव काळे, शहाजीराव कदम, नारायणभाऊ खेसे, डॉ. गोरख गुळवे व दत्तात्रय नावडकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

प्रास्ताविक डॉ. संकेत मोरे, परिचय वाचन विजयकुमार गायकवाड, सूत्रसंचालन सुहास गलांडे व आभार प्रदर्शन पांडुरंग वाघ यांनी केले.

## हरिश्चंद्र गडावर दुर्दैवी घटना, दर्शनाहून परतताना भाविकावर काळाचा घाला

**ओतूर (दै. संध्या)**

राज्यभरात महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात आहे. या दिनानिमित्त अनेक भाविक भगवान शंकराच्या दर्शनासाठी मंदिरात जात आहेत. यामुळे प्रत्येक मंदिरात भाविकांची मांदियाळी जमली आहे. मात्र या उत्साहाला गालबोट लावणारी दुर्दैवी घटना पुणे जिल्ह्यात घडली आहे. पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर तालुक्यातील हरिश्चंद्र गडावर दर्शनासाठी गेलेल्या भाविकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. महाशिवरात्री निमित्त हरिश्चंद्र गडावर दर्शनासाठी हजारो भाविक दरवर्षी दर्शनासाठी खिरेश्वर बाजूने हरिश्चंद्र गडावर पुरातन शिवशंकर मंदिरातील शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. रविवारी महाशिवरात्रीनिमित्त हरिश्चंद्र गडावर दर्शनकरून खाली उतरताना कड्यावरून निसटलेला दगड लागून एक भाविक गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. सुरेश किसन डामसे (वय ४५, रा. घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे) असे ठार झालेल्या भाविकांचे नाव आहे. सुरेश हे दर्शन आटोपून जुन्नर दरवाज्याकडील पायवाटेने खाली उतरत होते. यावेळी कड्यावरून एक मोठा दगड अचानक निसटून त्यांच्या डोक्यावर कोसळला.

## धामणीला महादेव मंदिरात रुद्राभिषेक

**मंचर (दै. संध्या)**



आंबेगांव तालुक्याच्या पूर्व भागातील धामणी येथील पेठेतील पुरातन श्री महादेव मंदिरात महाशिवरात्री सोहळा मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. पहाटे श्री महादेवाचा महारुद्राभिषेक व आरती झाल्यानंतर दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले यावेळी महिला भाविकांची संख्या मोठी होती त्यानंतर सकाळी दहा वाजता ह.भ.प.गणेश महाराज लव्हारे आळंदीकर यांचे किर्तन झाले किर्तनाला भाविकांची गर्दी होती.त्यानंतर भाविकांना केळी व खिचडीचा प्रसाद वाटण्यात आला यावेळी संदीप आळेकर, सतीष तांबे, गणपत भांडारकर, दिनकर दिवेकर, सुभाष जाधव, प्रथमेश विधाटे, सुजल विधाटे, मुरलीधर देखणे, निलेश करंजखेले, बाबाजी गाढवे, सिताराम टेलर जाधव यांनी व्यवस्था पाहीली. मंदिराचे शिखरावर व परिसरात आकर्षक रोषणाई व फुलांची सजावट केलेली होती. धामणीच्या पवित्र संगमावरील पुरातन महादेव देवस्थानात उत्तम जाधव, एकनाथ जाधव, दिनेश जाधव यांच्या हस्ते तर येथील खंडोबा मंदिराच्या आवारातील महादेव मंदिरात सेवैकरी दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, प्रभाकर भगत, शांताराम भगत, राजेश भगत यांनी महारुद्राभिषेक केला. रुद्राभिषेकाचे पौरोहित्य मुकुंद क्षिरसागर.

यावेळी उपसरपंच कैलास वाघ. फकीरा वायकर. दत्तात्रय वायकर.सिताराम वायकर. गणेश वायकर.सोमनाथ वीर व सेवेकरी वायकर.कुरकुटे.वाघ. वीर मंडळी उपस्थित होती.

बाळासाहेब बेरी व प्रमोद देखणे यांनी केले पहाडदरा येथील वाघ दऱ्यातील पुरातन महादेव मंदिरात पहाटे अभिषेक सरपंच मच्छिंद्र वाघ यांच्या हस्ते झाला त्यानंतर ह.भ.प.तान्हाजी महाराज तांबे यांचे किर्तन झाले. किर्तनाला अंबिका भजन मंडळीच्या टाळकऱ्यांनी साथ दिली यावेळी भाविकांना देवस्थानाच्या वतीने खिचडी केळीचे वाटप करण्यात आले दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.अवसरी. निरगुडसर मेंगडेवाडी येथील भाविक दर्शनासाठी आलेले दिसत होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाशिवरात्री उत्सवानिमित्त शिवमंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नरच्या शहरातील पंचलिंग, उत्तरेश्वर, गिरनेश्वर, रामेश्वर, सूर्य कुंडेश्वर, वैजनाथ, वाळकेश्वर, काशीविश्वेश्वर, रामेश्वर, अस्तेश्वर, नर्मदेश्वर, जगदीश्वर, या १२ शिवमंदिरांमध्ये महाशिवरात्री उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या या मंदिरांमध्ये शिवभक्तांनी सकाळपासूनच रांगा लावून मोठ्या भक्ती भवाने शिवलिंगाच्या दर्शनाचा लाभ घेतला घेतला. शहरातील सर्व शिवमंदिर परिसर बम-बम भोलेच्या नाम गजरांनी दुमदुमून गेला होता. मंदिरांमध्ये शंकराची पूजा-अर्चा, अभिषेक भजन कीर्तन आदि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व आलेल्या भाविकांना खिचडी, केळी व दुधाचे वाटप करण्यात आले होते. त्याचा लाभ हजारो शिवभक्तांनी घेतला.

### श्री हरणेश्वरच्या मूर्तीची ग्रामप्रदक्षिणा



कळस (दैनिक संध्या) : महाशिवरात्रीनिमित्त कळस (ता. इंदापूर) येथील ग्रामदैवत श्री हरणेश्वर मंदिरात आज पहाटेपासूनच शिवभक्तांनी दर्शनासाठी हजेरी लावली होती. हर हर महादेवच्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांनी रांगा लावून शिस्तबद्ध पद्धतीने हरणेश्वराचे दर्शन घेतले. महाशिवरात्रीनिमित्त पहाटे श्री हरणेश्वर, श्री काशी विश्वेश्वर, श्री कांडेश्वर, श्री रामेश्वर, श्री खुलेश्वर, श्री सिद्धेश्वर व श्री नागेश्वर या ऐतिहासिक सातश्वरांच्या शिवलिंग मंदिरांमध्ये अभिषेक, महापूजा व महाआरती झाली. यानंतर श्री हरणेश्वर मूर्तीची ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आल्याने मंदिराचे रूप खुलले होते. भाविकांना सकाळी खिचडी महाप्रसाद व फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी बारामतीच्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाने मंदिरात आध्यात्मिक चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून श्री हरणेश्वर महादेवाची माहिती दिली. सायंकाळी युवा प्रवक्ते अक्षय महाराज पिंगळे (बीड) यांच्या कीर्तनाचे व रात्री जागर आयोजित केला होता. दरम्यान येथील मंदिर परिसरात वृक्षारोपण करुन संवर्धनाचा संकल्प गावातील तरुणांनी केला. ग्रामदैवत हरणेश्वर हे चिंकारा हरणांशी संबंधित असल्याने येथे हरणांना अभय आहे.

## व्याख्यानमाला प्रबोधनाचे साधन : हास्य कवी अशोक नायगावकर

**भिगवण (दै. संध्या)**



जे न दिसे रवी, ते दिसे कवी या न्यायाने कवीच्या दूरदृष्टीतून कविता निर्माण होत असतात. त्या कविता वाचून, ऐकून मनुष्याने आपले जीवन रंगवायला पाहिजे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक व हास्य कवी अशोक नायगावकर यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय मराठा महासंघ व छत्रपती शिवराय सार्वजनिक वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त आयोजित केलेल्या राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेतील प्रथम पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष म्हणून भिगवणचे सरपंच गुराप्पा पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे प्रायोजक प्रतिनिधी भिगवण येथील श्रीनाथ पतसंस्थेचे चेअरमन पराग जाधव, शेटफळ गढे येथील गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर व सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव उर्फ माऊली नरहरी भोसले, भिगवण येथील हॉटेल आयर्न अँड लॉजिंग तसेच हॉटेल विहान रेस्टोबारचे संचालक संदीप शेठ वाकसे तसेच मदनवाडी येथील हॉटेल विश्वजीत व व्यंकटेश लॉन्स चे संचालक नानासाहेब बंडगर हे उपस्थित होते. नायगावकर पुढे म्हणाले की, व्याख्यानमाला प्रबोधनाचे एक साधन असून अशा व्याख्यान मालेत कवींचा सुद्धा समावेश व्हावा, ही गर्वाची बाब आहे. हास्य कविता वाचून किंवा ऐकून मानवातील नकारात्मकता नाहीसी होऊन तो सकारात्मकतेने जीवन जगू शकतो. हास्य हे जीवनाचे खरे गमक आहे. तेव्हा या माध्यमातून मानवाने जीवनाचा आनंद घ्यायला पाहिजे असेही ते म्हणाले स्त्री-पुरुषांच्या ताणतणावातील हलके - फुलके प्रसंग तसेच पुणे मुंबईतील साम्य किंवा फरक दाखवणाऱ्या कविता वाचून दाखवून त्यांनी श्रोत्यांची मनी यावेळी जिंकली. व्याख्यानमाला प्रबोधनासाठी आयोजित केली जाते, तेव्हा अशा व्याख्यानमालेमध्ये तरुणांचा सहभाग गरजेचा असल्याचे मत कृषी मंत्री भरणे यांनी आपल्या भाषणातून यावेळी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराज व जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रकाश बापू ढवळे, मानसिंगराव जाधव, अर्जुनबापू शिरसट, डी. एन. जगताप, पद्माकर माडगे , प्रा. रामदास झोळ, पराग जाधव, विकास वाघ, डॉ. माधवराव नाईक निंबाळकर, भरत मोरे, डॉ. संजय भोसले, संजय जगताप, डॉ. जयप्रकाश खरड, अजितअण्णा रानदिवे, राजेंद्र धांडे, अनिलराव काळे, शहाजीराव कदम, नारायणभाऊ खेसे, डॉ. गोरख गुळवे व दत्तात्रय नावडकर ह्या मराठा महासंघाच्या मार्गदर्शकांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत व सत्कार केला. प्रास्ताविक डॉ. संकेत मोरे, परिचय वाचन विजयकुमार गायकवाड, सूत्रसंचालन सुहास गलांडे तर आभार प्रदर्शन पांडुरंग वाघ यांनी केले.

## खैरेनगरमध्ये चोरट्यांकडून पती-पत्नीस बेदम मारहाण

**कवठे येमाई (दै. संध्या)**

शिरूर तालुक्यातील खैरेनगर येथे रात्रीच्या सुमारास सशस्त्र चोरट्यांनी पती-पत्नीस बेदम मारहाण करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात ज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. खैरेनगर येथील बाळू खैरे हे रात्रीच्या वेळी कुटुंबियांसह घरात झोपलेले होते. रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास चार अज्ञात सशस्त्र चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून घरात आले. त्यावेळी त्यांच्या हातात कोयते व काठ्या होत्या. त्यांनी बाळू व त्यांची पत्नी जमुनाबाई हिला हाताने मारहाण करत दमदाटी केली.जमुनाबाई यांना कोयत्याचा धाक दाखवून दमदाटी करत अंगावरील सर्व दागिने काढून घेतले. एकाने घरातील कपाट उघडून कपाटातील दहा हजार रुपये काढून घेऊन गेले.मात्र जाताना बाहेर आले आणि आरडाओरडा केला तर बघा अशी धमकी देऊन दरवाजाची कडी लावून चौघेजण पळून गेले.काही वेळाने बाळू खैरे यांनी घराबाहेर येऊन शेजारील नागरिकांना घडलेला प्रकार सांगितला असता नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली.दरम्यान सदर चोरट्यांनी गावातील सुनील खैरे यांच्या घरी देखील चोरी केल्याचे समोर आले. तर सदर घटनेत चोरट्यांनी तब्बल चार ते पाच तोळे सोन्याचे तसेच काही चांदीचे दागिने व वीस हजार रुपये रोख रक्कम चोरी केली असून घडलेल्या प्रकाराबाबत बाळू धोंडीबा खैरे (वय ६९ वर्षे रा. खैरेनगर ता. शिरुर जि. पुणे ) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी चार अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे हे करत आहेत.

# प्रदिपभाऊ कंद यांचे राजकीय पुनर्वसन करीत जिल्हा नियोजन किंवा झेडपीवर संधी देऊ : आमदार माऊली कटके

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**



प्रदिप वसंत कंद यांनी गेल्या १५ वर्षांत विनापद या भागासाठी केलेले काम मोठे आहे. निवडणुकीतील जय-पराजय हा तांत्रिक असला, तरी लोकांच्या हृदयातील त्यांचे अढळ स्थान कायम आहे.पेरणे-लोणीकंद गटातील जनभावनेचा आदर करून प्रदिपभाऊ कंद यांना पुणे जिल्हा परिषद किंवा जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सन्मानाचे पद देऊन त्यांचे राजकीय पुनर्वसन केले जाईल, असे आश्वासन आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांनी येथे दिले. पेरणे,लोणीकंद येथे आयोजित आभार मेळाव्यात प्रदिप वसंत कंद यांच्या पुनर्वसनाची मागणी पेरणे - लोणीकंद जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांनी व जनतेने आक्रमकपणे लावून धरली आहे.यावर बोलताना आमदार कटके यांनी कंद यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.या गटात 'दुप्पट निधी देऊन न्याय देऊ' आमदार माऊली कटके म्हणाले की, "अजितदादांच्या आकस्मिक जाण्याने आपण एका मोठ्या नेतृत्वाला मुकलो, ज्याचा परिणाम निवडणुकीवर झाला. मात्र,आता खचून न जाता लढण्याची वेळ आहे. या गटात धनशक्तीचा वापर करून जनशक्ती दडपण्याचा प्रयत्न झाला असला, तरी विकासकामांत आम्ही मागे हटणार नाही. जिल्हा परिषद सदस्याला मिळतो त्यापेक्षा दुप्पट निधी या १२ गावांना मिळवून देण्याची जबाबदारी माझी असेल. शिरूर-हवेलीत सर्वाधिक निधी लोणीकंद गटाला दिला जाईल. या भव्य मेळाव्याचे पेरणे - लोणीकंद गट परिसरातील राजकारणात नवीन ऊर्जा भरली असून, आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांनी दिलेल्या शब्दामुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.तसेच या मेळाव्याला मोठ्या प्रचंड गर्दीने कार्यालय भरून मोठा प्रतिसाद लाभला आहे. याप्रसंगी लोणीकंद गणाच्या उमेदवार लोचन शिवले, पेरणे गणाच्या उमेदवार संगीता वाळके सह पेरणे - लोणीकंद झेडपी गटातील विविध पदाधिकारी, आजी, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाऊ असावा तर राकेशभाऊ सारखा व्यासपीठावर प्रदिप कंद आणि राकेश कंद यांच्यातील बंधुत्वाचा उल्लेख करताना आमदार कटके भावूक झाले. भाऊ असावा तर राकेश कंद यांच्यासारखा,जो प्रत्येक संघर्षात सावलीसारखा सोबत राहतो. अशा निष्ठवान कुटुंबाला आणि कार्यकर्त्यांना मी वाऱ्यावर सोडणार नाही. प्रदिपभाऊंचे पुनर्वसन हा केवळ पक्षाचा निर्णय नसून, ती इथल्या जनतेच्या भावनांची गरज आहे," असेही त्यांनी नमूद केले.

मेळाव्यात कार्यकर्त्यांची आग्रही मागणी - या मेळाव्याला पेरणे- लोणीकंद झेडपी गट व परिसरातील हजारो नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते. अजितदादांनी निवडलेला माणूस कामाचाच असतो,पण धनशक्तीमुळे आमचा पराभव झाला.आता आमदारांनी भाऊंना स्वीकृत सदस्य करून न्याय द्यावा, अशी मागणी महिला आणि ग्रामस्थांनी एकमुखाने केली.राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर यांनीही संघटनेच्या वतीने प्रदिप कंद यांना योग्य न्याय दिला जाईल,असे स्पष्ट केले.

### रडणार नाही, आता लढणार प्रदिपभाऊ कंद यांचा निर्धार

आभार मेळाव्यात बोलताना प्रदिप वसंत कंद यांनी पराभवाचे दुःख बाजूला सारून पुन्हा कामाला लागण्याचे संकेत दिले. हा पराभव जिव्हारी लागला आहे, पण १२ हजार २०० मतदारांनी दाखवलेला विश्वास हीच माझी खरी ताकद आहे. माझ्या मुलीला 'बाबा जिंकला' हे सांगता आले नसले,तरी 'बाबा लोकांसाठी लढतोय' हे मी अभिमानाने सांगेन.एमआयडीसी असो वा स्थानिक प्रश्न,आम्ही कोणाच्या पोटावर पाय देऊ देणार नाही. माऊली आबांसारखा मोठा भाऊ माझ्या पाठीशी उभा आहे,हेच माझे भाग्य आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मंत्रालयात संत सेवालाल महाराज यांची जयंतीनिमित्त अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव क्रांती पाटील यांच्या हस्ते संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



### संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.




**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची कारवाई**

### मुलुंड मेट्रो दुर्घटना: कार्यकारी अभियंता सत्यजित साळवे निलंबित

मुंबई (दैनिक संध्या) : मेट्रो लाईन ४ (वडाळा-कासारवडवली) मार्गावर मुलुंड येथे आज झालेल्या दुर्घटने प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकारी अभियंता सत्यजित साळवे यांना तात्काळ निलंबित करण्याचे निर्देश दिले आहेत. अपघातातील मृत व्यक्तीच्या कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त करतानाच जखमींच्या उपचाराचा खर्च एमएमआरडीए करणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. एमएमआरडीए प्रशासनाकडून दुर्घटनेची माहिती घेतानाच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सार्वजनिक सुरक्षेशी तडजोड करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा दिला. या दुर्घटनेची दखल घेत त्यांनी कार्यकारी अभियंता सत्यजित साळवे यांचे निलंबनाचे निर्देश दिले.

# जीवन, विचार, सामाजिक परिवर्तन आणि मानवतेचे दीपस्तंभ

भारतीय संत परंपरेत समाज प्रबोधनाचे, नैतिक मूल्यांचे आणि मानवतेचे दीपस्तंभ म्हणून संत सेवालाल महाराजांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ते बंजारा (लमाण) समाजाचे महान संत, समाजसुधारक आणि आध्यात्मिक मार्गदर्शक होते. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनातून सत्य, परिश्रम, प्रामाणिकपणा, समता, करुणा आणि बंधुभाव यांचा संदेश दिला. म्हणूनच संत सेवालाल महाराजांची जयंती हा केवळ उत्सवाचा दिवस नसून, त्यांच्या विचारांचे स्मरण करून ते आचरणात आणण्याचा पवित्र दिवस आहे.

रणजित पवार, उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

**संत सेवालाल महाराजांचे बालपण व व्यक्तिमत्त्व**

संत सेवालाल महाराजांचा जन्म साध्या बंजारा कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांच्यात विलक्षण बुद्धिमत्ता, निरीक्षणशक्ती आणि करुणा दिसून येत होती. समाजातील गरिबी, अज्ञान, अन्याय आणि दुःख पाहून त्यांच्या मनात समाजपरिवर्तनाची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यांनी सांसारिक लोभ, लालसा आणि स्वार्थपेक्षा समाजहिताला अधिक महत्त्व दिले. साधे राहणीमान, संयमी आचार-विचार आणि उच्च नैतिक मूल्ये हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते.

**सामाजिक परिस्थिती**

संत सेवालाल महाराजांच्या काळात बंजारा समाज अनेक सामाजिक कुप्रथांनी ग्रासलेला होता. व्यसनाधीनता, चोरी, हिंसा, अंधश्रद्धा आणि शिक्षणाचा अभाव यामुळे समाज मागासलेला होता. या परिस्थितीमुळे

समाजाच्या प्रगतीला अडथळे निर्माण होत होते. संत सेवालाल महाराजांनी या समस्यांची मूळ ओळखून त्यावर उपाय सुचवले आणि समाजाला योग्य दिशा दिली.

**समाजसुधारणेचे कार्य**

संत सेवालाल महाराज हे केवळ उपदेशक नव्हते, तर कृतीशील समाजसुधारक होते. त्यांनी चोरी, व्यसन आणि हिंसा यांसारख्या वाईट प्रवृत्तींना ठाम विरोध केला.

"परिश्रम हाच खरा धर्म आहे" हा त्यांचा मूलमंत्र होता. त्यांनी प्रत्येकाला कष्ट करून प्रामाणिक जीवन जगण्याचा संदेश दिला. अन्यायाने किंवा फसवणुकीने मिळवलेली संपत्ती त्यांनी नाकारली आणि श्रमातून मिळालेल्या अन्नालाच पवित्र मानले.

**धार्मिक व नैतिक विचार**

संत सेवालाल महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन अत्यंत व्यापक होता. धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे, तर सदाचार आहे, हे त्यांनी समाजाला पटवून दिले. सत्य बोलणे, दुसऱ्याच्या हक्कावर गदा न आणणे, गरजूंची मदत करणे, वृद्धांचा सन्मान करणे आणि स्त्री-पुरुष समानता पाळणे, हीच खरी धार्मिकता आहे, असे ते सांगत.

सर्व धर्मांचा सन्मान करावा, जात-पात, उच्च-नीच भेद न करता मानवतेला सर्वोच्च स्थान द्यावे, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

**स्त्री–पुरुष समानता आणि सामाजिक न्याय**

त्या काळात स्त्रियांच्या अधिकारांकडे अपेक्षित तेवढे लक्ष दिले जात नव्हते. संत सेवालाल महाराजांनी स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट पुरस्कार केला. स्त्री ही पुरुषाइतकीच सक्षम आहे, तिचा सन्मान झाला पाहिजे, असा त्यांनी आग्रह धरला. सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमान यांचा संदेश देत त्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणला.



**निसर्गप्रेम व पर्यावरणविषयक दृष्टी**

संत सेवालाल महाराजांना निसर्गाविषयी अपार प्रेम होते. झाडे, पशुपक्षी आणि पर्यावरण यांचे संरक्षण करणे हे मानवाचे कर्तव्य आहे, असे ते मानत. निसर्गाचा समतोल राखल्यासच मानवाचे जीवन सुखी व समृद्ध होईल, ही त्यांची ठाम धारणा होती. आजच्या पर्यावरणीय संकटांच्या पार्श्वभूमीवर त्यांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात.

**सामाजिक सलोखा व बंधुभाव**

समाजात ऐक्य नसेल, तर प्रगती शक्य नाही, हे संत सेवालाल महाराजांनी ओळखले होते. त्यांनी सर्व समाजघटकांमध्ये बंधुभाव वाढवण्याचा प्रयत्न केला. परस्पर सहकार्य, प्रेम आणि विश्वास यांवर समाज उभा राहतो, असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे समाजात सलोखा आणि आत्मसन्मान वाढला.

**संत सेवालाल महाराजांचा समाजावर प्रभाव**

संत सेवालाल महाराजांच्या विचारांमुळे बंजारा समाजात मोठे परिवर्तन घडून आले. व्यसनमुक्ती, प्रामाणिक श्रम, शिक्षणाची आवड आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढण्यास त्यांच्या शिकवणीचा मोठा वाटा आहे. त्यांच्या विचारांनी समाजाला आत्मविश्वास दिला आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा दिली.

**जयंतीचे महत्त्व आणि आजची उपयुक्तता**

संत सेवालाल महाराजांची जयंती विविध ठिकाणी मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी केली जाते. या दिवशी प्रवचने, कीर्तन, सामाजिक प्रबोधन कार्यक्रम, स्वच्छता मोहिमा, वृक्षारोपण आणि गरजूंसाठी मदतकार्य केले जाते.

जयंती साजरी करण्याचा खरा अर्थ म्हणजे त्यांच्या विचारांचे आचरण करणे होय. आजच्या स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात सत्य, परिश्रम आणि मानवतेचा मार्ग दाखवणारे त्यांचे विचार अत्यंत मार्गदर्शक ठरतात.

संत सेवालाल महाराज हे केवळ एका समाजाचे संत नव्हते, तर संपूर्ण मानवजातीचे मार्गदर्शक होते. त्यांचे जीवन हे सत्य, श्रम, करुणा आणि समतेचा जिवंत आदर्श आहे. आधुनिक युगातही त्यांच्या विचारांची गरज अधिक जाणवते. संत सेवालाल महाराजांचा आदर्श स्वीकारून आपण प्रामाणिक, सदाचारी आणि समाजोपयोगी जीवन जगलो, तरच त्यांच्या जयंतीचे खरे सार्थक होईल.

## प्रधानमंत्री मोदींकडून महाराष्ट्रासह चार राज्यांना रेल्वे प्रकल्पांची भेट

**१८,५०९ कोटींच्या खर्चाला मंजुरी**

नवी दिल्ली (दै. संध्या)

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना बळकटी देणाऱ्या तीन महत्त्वाच्या बहुमार्गी प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणा आणि कर्नाटक या चार राज्यांतील १२ जिल्ह्यांमध्ये रेल्वेचे जाळे विस्तारणार असून, एकूण ३८९ किलोमीटरची भर पडणार आहे. १८,५०९ कोटी रुपये अंदाजे खर्च असलेले हे प्रकल्प २०३०-३१ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा कसारा – मनमाड दरम्यानच्या ३ या आणि ४ थ्या रेल्वे मार्गाचा समावेश आहे. यासोबतच दिल्ली – अंबाला आणि बल्लारी – होस्पेट या मार्गांवरही ३ रा आणि ४ था मार्ग उभारला जाणार आहे. या वाढीव रेल्वे क्षमतेमुळे वाहतुकीतील कोंडी कमी होऊन रेल्वे सेवेची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता वाढणार आहे. पीएम गती शक्ती राष्ट्रीय बृहद् आराखड्यानुसार या प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले असून, यामुळे मालवाहतूक आणि प्रवासी दळणवळण अधिक सुलभ होईल. या प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा ग्रामीण भागाला होणार असून, सुमारे ९७ लाख लोकसंख्या असलेल्या ३,९०२ गावांची संपर्क व्यवस्था सुधारणार आहे.

## नाशिक-पालघर प्रवासाला मिळणार वेग!

**NH-160A महामार्गाच्या ३३२० कोटींच्या प्रकल्पास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी**

नवी दिल्ली (दै. संध्या)

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय महामार्ग-१६० ए (NH-160A) च्या घोटी–त्र्यंबक (मोखाडा)–जव्हार–मानोर–पालघर या १५४.६३५ किमी लांबीच्या विभागाच्या पुनर्वसन आणि चौपदरीकरण सुधारणेला सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी एकूण ३,३२०.३८ कोटी रुपयांचा भांडवली खर्च अपेक्षित असून, यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीमधील कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे.

नाशिकच्या पश्चिम भागातील अंबड आणि सातपूर सारख्या औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या मालवाहतुकीमुळे सध्या नाशिक शहरावर वाहतुकीचा मोठा ताण येत आहे. सध्याची ही वाहतूक एनएच-८४८ मार्गे शहरातून जात असल्याने नागरी रस्ते कोंडीचा सामना करत आहेत. या नवीन प्रकल्पामुळे त्र्यंबक मार्गे औद्योगिक क्षेत्रांना एक सक्षम पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे शहरातील वाहतुकीचा ओघ कमी होईल. विशेषतः मुंबई आणि दक्षिणेकडून येणारी वाहतूक इगतपुरी इंटरचेंजद्वारे समृद्धी महामार्ग आणि पुढे एनएच-१६० ए चा वापर करून त्र्यंबक व नाशिककडे जलद गतीने पोहोचू शकेल. २०२८ पर्यंत या मार्गावरील वाहतूक प्रति दिन १०,००० वाहनांच्या पुढे जाण्याचा अंदाज असल्याने या चौपदरीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

हा प्रकल्प 'पीएम गतीशक्ती' तत्त्वावर आधारित असून, याद्वारे महाराष्ट्रातील ६ आर्थिक नोड्स, ७ सामाजिक नोड्स आणि ८ लॉजिस्टिक नोड्स जोडले जाणार आहेत. यात प्रामुख्याने तारापूर आणि बोईसर येथील सेझ (SEZ), मोखाडा औद्योगिक उद्यान आणि वाडा येथील औद्योगिक वसाहतींचा समावेश आहे. तसेच त्र्यंबकेश्वर, जव्हार राजवाडा, वैतरणा नदी आणि अर्नाळा किल्ला यांसारख्या पर्यटन स्थळांनाही या महामार्गाचा मोठा लाभ मिळेल. पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील पायाभूत सुविधा सुधारल्यामुळे या क्षेत्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठी गती मिळणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा वेळ आणि वाहनांच्या देखभालीचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे ४४ लाखांहून अधिक व्यक्ती-दिवसांचा रोजगार निर्माण होणार आहे. हा महामार्ग पुढे दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे (NE-4) आणि वाढवण बंदरासारख्या महत्त्वाच्या केंद्रांशी जोडला जाणार असल्याने राज्याच्या लॉजिस्टिक कामगिरीत मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

# त्याग आणि बलिदानाचे मूर्तिमंत रूप – श्री गुरु तेग बहादूर साहिबजी

श्री गुरु तेग बहादूरजी हे शीख समुदायाचे गुरु होते, ज्यांची शहादत केवळ एका धर्म किंवा समुदायापुरती मर्यादित नसून, संपूर्ण मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. एका आध्यात्मिक गुरूंनी अन्याय, अत्याचार आणि धार्मिक दडपशाहीसमोर झुकण्याऐवजी आपले शीश अर्पण केले; मात्र आपल्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड केली नाही. त्यामुळे त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आपल्याला त्या ऐतिहासिक क्षणाची आठवण होणे साहजिकच आहे.

■ लेखक – डॉ. अमरजीत कौंके हे पंजाबी व हिंदी भाषेतील प्रख्यात लेखक असून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत.
■ संपर्क : 9814231698 पटियाला, पंजाब
(गुरुद्वारा जन्मस्थान: शिरोमणी संत नामदेव, नरसी नामदेव, हिंगोली यांच्या सौजन्याने)

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, बलिदान आणि मानवतेच्या महान कार्याला अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे हिंद- दि-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे आयोजन २८ फेब्रुवारी व १ मार्चला नवी मुंबई येथील ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर येथे होत आहे.

श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी केवळ शीख समुदायातीलच नव्हे, तर भारतीय उपखंडाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक इतिहासातील एक महान विभूती आहेत. त्यांचे जीवन धैर्य, त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या सर्वोच्च आदर्शांचे प्रतीक आहे. त्यांचा जन्म इसवी सन १ एप्रिल 1621 रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु, गुरु हरगोबिंद साहिबजी यांचे धाकटे पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव गंभीर, शांत आणि आत्मचिंतनशील होता. इतर मुले खेळात रमलेली असताना गुरु तेग बहादूर साहिबजी एकांतात बसून ईश्वरचिंतन व साधनेत आनंद अनुभवत असत. त्यामुळेच पुढे त्यांचे जीवन बाह्य वैभवापेक्षा अंतःशक्ती आणि नैतिक दृढतेचे उदाहरण ठरले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींनी बालपणी शस्त्र व शास्त्र या दोन्हींचे शिक्षण घेतले. युद्धकौशल्य, घोडेस्वारी आणि तलवारबाजी यात त्यांनी प्रावीण्य मिळवले; मात्र कधीही हिंसा किंवा सत्तेच्या लालसेकडे त्यांचे मन वळले नाही. धर्म व मानवतेच्या रक्षणासाठीच शस्त्रांचा उपयोग अर्थपूर्ण असतो, हे ते जाणून होते. तरुणपणी त्यांनी दीर्घकाळ ध्यान व तपस्येचे जीवन स्वीकारले. त्यांच्या या वैराग्य व त्यागामुळेच त्यांना 'त्याग मल' असेही म्हटले गेले. हा त्याग संसारापासून पलायन नव्हता, तर अन्यायापुढे कधीही न झुकणारी आत्मशक्ती निर्माण करण्याचा मार्ग होता.

इसवी सन 1664 मध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी शिखांचे नववे गुरु झाले. त्या काळात भारतातील सामाजिक व धार्मिक वातावरण अत्यंत तणावपूर्ण होते. तत्कालिन शासकाच्या धोरणांमुळे धार्मिक असहिष्णूता वाढत होती. अनेक ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतर, मंदिरांचा विध्वंस आणि धार्मिक आस्थांवर कठोर निर्बंध लादले जात होते. अशा परिस्थितीत श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे गुरु-पद स्वीकारणे ही केवळ आध्यात्मिक जबाबदारी नव्हे, तर एक मोठे ऐतिहासिक आव्हान होते.

गुरु तेग बहादूर साहिबजींनी आपल्या गुरु-कालावधीत व्यापक प्रवास केला. पंजाबपासून बंगाल, बिहार, आसाम तसेच पूर्व भारतातील अनेक भागांत त्यांनी भ्रमण केले. या यात्रांचा उद्देश केवळ शीख पंथाचा विस्तार नव्हता, तर लोकांमध्ये निर्भयता, आत्मसन्मान आणि ईश्वरावरील खरी श्रद्धा जागवणे हाच होता. ईश्वर एकच आहे आणि सर्व मानव समान आहेत, हे ते शिकवत. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन सत्य, करुणा आणि प्रेमाचा मार्ग स्वीकारणे हीच खरी भक्ती आहे, असा त्यांचा संदेश होता.

गुरु तेग बहादूरजींची वाणी अत्यंत गूढ व तात्त्विक आहे. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये संकलित असून त्यामध्ये जीवनाची नश्वरता, मायेची असारता आणि ईश्वरभक्तीचा सखोल संदेश आढळतो. सुख-दुःख, मान-अपमान, भय-लोभ यापलीकडे जो जातो, तोच खऱ्या अर्थाने मुक्त आहे, असे ते सांगतात. आजही त्यांची वाणी माणसाला अंतःकरणाने मजबूत बनण्याची आणि बाह्य परिस्थितींनी विचलित न होण्याची प्रेरणा देते.

गुरु तेग बहादूरजींचे सर्वात महान व ऐतिहासिक योगदान म्हणजे धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले त्यांचे सर्वोच्च बलिदान होय. काश्मीरमधील पंडितांवर जबरदस्तीने दुसरा धर्म स्वीकारण्याचा दबाव टाकला जात होता. आपली श्रद्धा, संस्कृती आणि जीवनपद्धती वाचवण्यासाठी ते व्याकुळ झाले होते. जेव्हा ते गुरु तेग बहादूर साहिबजींकडे गेले, तेव्हा गुरुजींनी ही वेदना केवळ एका समुदायाची समस्या मानली नाही, तर तिला संपूर्ण मानवतेच्या व धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नाशी जोडले.




कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचा अधिकार आहे आणि कोणतीही सत्ता हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही, असे श्री गुरु तेग बहादूरजींनी ठामपणे सांगितले. भीषण परिणामांची जाणीव असूनही त्यांनी काश्मिरी पंडितांच्या रक्षणाचा संकल्प केला. हा त्यांच्या जीवनातील सर्वात धैर्यशील आणि ऐतिहासिक निर्णय होता. ही बाब तत्कालिन शासकांच्या दरबारापर्यंत पोहोचताच श्री गुरु तेग बहादूरजींना दिल्लीला बोलावण्यात आले. तत्कालिन शासकांचा धर्म स्वीकारल्यास त्यांचे प्राण वाचतील आणि मान-सन्मान व सुविधा मिळतील, असे सांगण्यात आले. पर्यायाने चमत्कार दाखवण्याची मागणीही करण्यात आली. मात्र गुरुजींनी दोन्ही प्रस्ताव नाकारले. धर्मांतर म्हणजे आत्म्याशी द्रोह, तर चमत्कार दाखवणे म्हणजे ईश्वराच्या नावाचा अपमान, असे त्यांचे मत होते.

जीवनाची किंमत मोजावी लागली तरी सत्य आणि विवेकाचा मार्ग स्वीकारण्याचा त्यांनी निर्धार केला.

इसवी सन 1675 मध्ये दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेग बहादूरजींना सार्वजनिकरीत्या शहीद करण्यात आले. त्यांच्या समोरच त्यांचे तीन परम शिष्य भाई मती दास, भाई सती दास आणि भाई दयाल दास यांचा अमानुष छळ करण्यात आला, तरीही गुरु तेग बहादूरजी ठाम राहिले. त्यांनी मृत्यू स्वीकारला; पण आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. भारतीय इतिहासात धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले हे एक अद्वितीय व अनुपम बलिदान आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या शहादतीचा दूरगामी परिणाम झाला. या बलिदानाने हे स्पष्ट केले की भारताचा आत्मा सहिष्णुता, विविधता आणि धार्मिक स्वातंत्र्यात दडलेला आहे. त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंहजींनी या शहादतीतून प्रेरणा घेऊन खालसा पंथाची स्थापना केली आणि अन्याय, अत्याचार व असत्याविरुद्ध संघटित संघर्षाचा मार्ग खुला केला. अशा प्रकारे गुरु तेग बहादूरजींचा त्याग येणाऱ्या पिढ्यांसाठी धैर्य आणि आत्मसन्मानाचा शाश्वत स्रोत ठरला.

श्री गुरु तेग बहादूरजींचे जीवन हेही शिकवते की खरा धर्म केवळ आपल्या अनुयायांच्या रक्षणापुरता मर्यादित नसतो. त्यांनी आपले प्राण शीखांसाठी नव्हे, तर हिंदू पंडितांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. यामुळे ते संकुचित धार्मिक सीमां पलीकडे जाऊन एक सार्वत्रिक मानवतावादी व्यक्तिमत्त्व ठरतात. मानवता संकटात असताना खरे संत व महापुरुष वैयक्तिक हितांपेक्षा समाजाच्या हितासाठी उभे राहतात, त्यांचे जीवन हा सक्षम पुरावा होय.

आजच्या काळात, जेव्हा जगातील अनेक भागांत धार्मिक असहिष्णुता, हिंसा आणि द्वेष वाढत आहेत, तेव्हा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश अधिकच सुसंगत ठरतो. भीतीसमोर झुकणे सोपे असते; पण सत्यासाठी उभे राहणे हेच खरे धैर्य आहे, हे त्यांचे जीवन शिकवते. आत्मबल आणि नैतिक दृढता कोणत्याही सत्तेपेक्षा अधिक शक्तिशाली असते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

इतिहास केवळ विजेत्यांनी नव्हे, तर सत्य, धर्म आणि मानवतेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांनी घडतो, हाच संदेश गुरु तेग बहादूरजींचे जीवन व बलिदानातून आपल्याला मिळतो. त्यांनी अंधःकारातही मानवतेला प्रकाशाचा मार्ग दाखवला.

धर्माचे रक्षण तलवारीने नव्हे, तर धैर्य, करुणा आणि सत्यनिष्ठेने होते, त्यामुळे श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे नाव भारतीय उपखंडात सदैव अमर दीपसारखे प्रज्वलित राहील...

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पिंपरी-चिंचवडमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) युवक कार्यकारिणी जाहीर


पुणे (दैनिक संध्या) : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पिंपरी चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने शहराध्यक्ष मा. कुणालभाऊ वाव्हाळकर आणि उपाध्यक्ष मा. धर्मपाल तांतरपाळे यांच्या नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. युवक शहराध्यक्ष डॉ. धम्मरत्न गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या प्रसंगी पक्षाच्या युवक आघाडीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली तसेच काही युवकांचा पक्षप्रवेशही करण्यात आला. युवकांना संघटनात्मक जबाबदाऱ्या देत पक्षबांधणीला चालना देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. भारत खरात यांची युवक कार्याध्यक्षपदी, सिद्धांत जगताप व क्रांतिदीप जाधव यांची युवक उपाध्यक्षपदी, राहुल नितनवरे यांची युवक सरचिटणीसपदी, दिलीप मोरे यांची संपर्क प्रमुखपदी आणि निखिल केरणाले यांची संघटन सचिवपदी संतोष डेंगळे युवक उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला चंद्रकांताताई सोनकांबळे, अझीजभाई शेख, विनोद चांदमारे, बाबा सर्वदे, दादा शिरोळे, राजू उबाळे, राजेंद्र कांबळे, विलास पाटील, रुक्मिणीताई पाटील, मायरा मॅडम, बाळासाहेब गायकवाड, योगेश भोसले, किरण सामिंदर, संतोष देंगळे, विकास गाडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराजदादा भास्कर यांनी केले, तर आभारप्रदर्शन सोमंथजी उबाळे यांनी केले.



### पोलीस सेवा मंडळ महाराष्ट्र राज्य – पुणे शहर कार्यकारिणी जाहीर

पुणे (दैनिक संध्या) : पोलीस सेवा मंडळ हे पोलीस व समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा असून पोलीस कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी, मनोबल वृद्धीसाठी तसेच समाजहिताच्या उपक्रमांसाठी सातत्याने कार्यरत आहे. या माध्यमातून मिळणारे सामाजिक सहकार्य पोलीस सेवा अधिक प्रभावी, लोकाभिमुख व मजबूत बनवते. पोलीस सेवा मंडळ, महाराष्ट्र राज्य अंतर्गत पुणे शहर कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली. त्यानुसार पुणे शहराध्यक्ष – श्री. रामदास गवते, वारकरी संप्रदाय विभाग अध्यक्ष – श्री. शेखर लोखंडे, वारकरी संप्रदाय विभाग उपाध्यक्ष – श्री. तुषारजी अल्हाट, जिल्हा सचिव – ॲड. शुभाजी घोडके पिल्ले, पुणे शहर महिला सचिव – रुचीजी गर्ग व सारिकाजी मर्चंट, पुणे शहर सचिव – पत्रकार श्री. सतीशजी राठोड, यांची निवड करण्यात आली आहे. सदर नियुक्तीपत्रे राज्य सचिव श्री. सुमितजी दरंदले व पुणे शहर प्रमुख श्री. रामदासजी गवते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रतिकजी खताळ, श्री. ओंकारजी अभ्यंकर, अश्विनी टाक, हर्षलजी कोरडे, पत्रकार कुलकर्णी मॅडम, श्री. शामजी शिंदे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साहेबराव सावंत यांचे निधन



लोणी काळभोर (दैनिक संध्या) : कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील साहेबराव विठोबा सावंत (वय. ८८) यांचे अल्पशा आजारामुळे दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अस्थी नदीत विसर्जन करून प्रदुषण करण्याऐवजी सावंत कुटुंबियांनी एका खड्डयात अस्थी विसर्जन करून त्यात आंब्याचे झाड लावले आहे. थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्यात नोकरी करुन ते निवृत्त झाले होते. गावातील सामाजिक कार्यात ते सक्रिय सहभागी होत असत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, एक मुलगी, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. मुंबईतील रबाळे पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले बाळकृष्ण सावंत यांचे ते वडील व ग्रामीण सर्वांगीण विकास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुवर्णा सावंत यांचे सासरे होत.

### आगीने शेती पिकांचे नुकसान, पंचनामे करून मदत देण्याची चंद्रकांत चौंडकर यांची मागणी

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील राजुरी व नायगाव शिवेवर शेतात अचानक आग लागल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामध्ये डाळिंब,सीताफळ,चिंच, ज्वारी,पीव्हीसी पाईप,ड्रीपचे पाईप,शेततळ्याचा कागद, कोंबड खत पिशव्या आदी नुकसान झाले आहे.यामध्ये शेतकरी अविनाश शेंडगे,गंगाराम शेंडगे,शोभा शेंडगे,बाबुलाल शेंडगे,नारायण चौंडकर,विजय भिंताडे,सुवर्णा देशमुख,मीनाक्षी सूर्यराव, जयश्री घोरपडे आदी शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.आग विजविण्यासाठी अविनाश शेंडगे,शोभा शेंडगे,दिलीप मेमाणे,नाना मेमाणे,मेजर बाळासाहेब कड,सागर खळदकर,रमेश कांबळे,आकाश शेंडगे,सुनीता चौंडकर,पोलीस पाटील ज्योती चौंडकर,महसूल सेवक संतोष जाधव,नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर,संजय यादव,माऊली मेमाणे,अशोक सुरवसे आदींनी प्रयत्न केले. शासनाने पंचनामा करून संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी,अशी मागणी नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर व संचालक मंडळाकडून करण्यात आली आहे.

### तरुणाने जीवन संपवले; पोलिस तपास सुरु

पुणे (दैनिक संध्या) : शहरात 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. वाल्हेकरवाडी येथील गुरुद्वारा चौकाजवळ २४ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (१४ फेब्रुवारी) दुपारी उघडकीस आली. मृत तरुणाचे नाव समर्थ संजय माळी (वय २४) असे असून, तो मूळचा सोलापूर जिल्ह्यातील रहिवासी होता. तो सध्या गुरुद्वारा चौकाजवळील वाल्हेकरवाडी परिसरात मित्रांसोबत राहत होता आणि एका खासगी फायनान्स कंपनीत नोकरी करत होता. शनिवारी दुपारी समर्थचे मित्र जेवणासाठी बाहेर गेले होते. या दरम्यान समर्थने घरात गळफास घेतल्याचे सांगितले जाते. मित्र परत आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर समर्थला तातडीने यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# सासवड परिसरातील शिवालयांतून घुमला हरहर महादेवचा गजर

सासवड (दै. संध्या)

महाशिवरात्रीच्या निमित्ताने सासवड परिसरातील विविध शिवमंदिरात अभिषेक, महापुजा, भाविकांची दर्शनासाठी गर्दी, महाप्रसाद वाटप, आकर्षक मंदिर सजावट, भजन, हरिनाम सप्ताह आदी उपक्रमांनी शिवशंभुचा जागर करून हा दिवस मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. परिसरात दिवसभर सर्वच प्रमुख मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती.

कऱ्हानदीच्या काठावरील निसर्गरम्य अशा ठिकाणी असलेल्या श्री सिद्धेश्वर मंदिरात महांकाल स्वरूपात शिवलिंगाची सजावट करण्यात आली होती. मध्यरात्री रुद्राभिषेक, सिद्धेश्वर भजनी मंडळाचे एकतारी भजन सकाळी केतकावळे येथील बालाजी मंदिर देवस्थानच्या वतीने नित्यपुजा, दिवसभर भाविकांसाठी प्रशांत ज्ञानोबा जगताप (पुणे) यांच्या वतीने महाप्रसाद वाटप, सायंकाळी शिवशंभो ग्रुपच्या वतीने शेजारती, डॉ प्रवीण जगताप, नंदू बापू जगताप व किरणकुमार जगताप यांची आकर्षक मंदिर सजावट व परिसरातील शेतकऱ्यांचे नियोजन यामुळे कार्यक्रम विशेष लक्षवेधी ठरला.



पुरातन चांगावटेश्वर मंदिरातही प्रथमप्रहरी व्यवस्थापक पिंटू जगताप यांच्या हस्ते व अक्षय बेलसरे यांच्या पौरोहित्याखाली रुद्र अभिषेक करण्यात आला.त्यानंतर भाविकांचे अभिषेक पार पडले. लक्ष्मी नारायण मंदिर च्या वतीने हभप निलेश महाराज शिंदे यांनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन मंदिरात केले होते. हडपसर येथील शिवभक्त अमोल हिंगणे व कै. दीपक म्हेत्रे परिवाराकडून भाविकांसाठी महाप्रसाद ठेवण्यात आला होता. मंदिर सुधार समितीच्या वतीने विद्युत रोषणाई, फुलांची सजावट दर्शन व्यवस्था, पिण्याचे पाणी आदी सुविधा देण्यात आल्या होत्या. विशाल जंगम, परशुराम देशमुख, सुनिल कामथे, चेतन एक्के, अक्षय गोडसे, धैर्यशील देशमुख आदींनी सोहळ्याचे आयोजन केले होते. शहरातील कऱ्हा व चांबळी नद्यांच्या संगमावरील प्रसिद्ध संगमेश्वर मंदिर येथे देखील भाविकांनी दिवसभर दर्शनासाठी गर्दी केली होती. सर्व परिसर शिवभक्तीने फुलून गेला होता.



## पुरोगामी महाराष्ट्राने केरळचा आदर्श घ्यावा : डॉ. हुलगेश चलवादी

पुणे (दै. संध्या)



■ 'लाडके विद्यार्थी' योजना राबवून शिक्षणाच्या कक्षा रुंदावण्याचे आवाहन

विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातून राज्य सरकारने 'लाडके विद्यार्थी' योजना सुरू करून गोरगरिब, होतकरू तसेच सर्वसामान्यांसाठी उच्च शिक्षणाचे द्वार खुले करावे; असे आवाहन शिक्षण क्षेत्रातील जाणकार, बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी रविवारी (ता.१५) केले. केरळ राज्याने सरकारी, सरकारी अनुदानित कला व विज्ञान महाविद्यालयांमधील पदविका अभ्यासक्रम पुर्णत: मोफत केला आहे. याच धर्तीवर राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने सर्व शाखेतील पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित करावे, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सरकार या योजनेच्या माध्यमातून प्रोत्साहन देईल. हेच पाऊल छत्रपती-फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राची नवी दिशा ठरवेल. सरकारने एससी-एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आरटीईच्या माध्यमातून शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला आहे. परंतु, केवळ आठवीपर्यंतच शिक्षण मोफत आहे. अशात गरजवंताच्या पुढील शिक्षणाची वाणवा होते. आर्थिक, मानसिक तनाव वाढत त्यांचे खच्चीकरण होतेय. क्रांतीज्योती महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीमाईंनी पुण्यातूनच शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीची मुर्हतमेढ रोवली होती. आरक्षण लागू करीत सर्वसामान्यांना शिक्षणाची कवाड उघडणाऱ्या छत्रपती शाहु महाराजांच्या विचारांचा वारसा चालवत महाराष्ट्राने सर्वांसाठी शिक्षण मोफत करावे, असे मत डॉ.चलवादींनी व्यक्त केले. राज्यात इयत्ता ९ आणि १० वी मध्ये शिक्षण सोडणाऱ्या मुलांचे प्रमाण १२.६% आणि मुलींचे प्रमाण १०.३% एवढे आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या या आकडेवारीत २०२३-२४ च्या तुलनेत १ टक्क्यांची वाढ दिसून येते. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात दरवर्षी हजारो विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे पदवी शिक्षणापासून वंचित राहतात.

## पुणे-सातारा रस्त्यावरील लॉजवर छापा; महिलेसह तिघांना अटक

पुणे (दै. संध्या)

वेश्याव्यवसाय प्रकरणात गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक आणि व्यापार प्रतिबंधक कक्षाने पुणे-सातारा रस्त्यावरील एका लॉजवर छापा टाकला. या कारवाईत एका युवतीला ताब्यात घेण्यात आले. तिला वेश्या व्यवसायास प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून दलाल महिलेसह तिघांना अटक करण्यात आली. वर्षा शंकर शिरसाठी (३५, रा. विजयनगर, चिंचवड), अनिल मदन जेधे (३५, रा. पेपर मिलसमोर, साने चौक, चिंचवड) आणि जीवन प्रमोद इंगोले (३३, सध्या रा. साई लॉज, बालाजीनगर, पुणे-सातारा रस्ता) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरोधात सहकार नगर पोलिस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक आणि व्यापार प्रतिबंध अधिनियमान्वये (पीटा) तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे-सातारा रस्त्यावरील साई लॉजमध्ये एका युवतीला संशयित आरोपी दलाल शिरसाठी, जेधे यांनी आणले होते. अल्पवयीन युवतीला पैशांचे आमिष दाखवून तिला वेश्या व्यवसायास प्रवृत्त केले जात असल्याची महिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. पोलिसांनी लॉजमधून एका अल्पवयीन युवतीला ताब्यात घेतले.

## धानोरीत महाशिवरात्री उत्सवाचा उत्साह


**पहिल्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी मांदियाळी**

धानोरी पुणे (दै. संध्या)

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, धानोरी तर्फे आयोजित 'महाशिवरात्री महोत्सव एवं आध्यात्मिक जागृती' कार्यक्रमाचा पहिला दिवस रविवारी (१५ फेब्रुवारी) अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. कमल पार्क परिसरातील या सोहळ्यात धानोरी आणि लोहगाव परिसरातील हजारो भाविकांनी हजेरी लावून दर्शनाचा लाभ घेतला.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण असलेल्या सात फुटी वॉटर फाऊंटन शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या. तसेच १२ ज्योतिर्लिंगांची प्रतिकृती, चैतन्य महादेव दर्शन आणि सहस्त्र शिवलिंग दर्शनाने उपस्थितांचे मन मोहून टाकले. केवळ धार्मिक विधीच नव्हे, तर समाजाला नवी दिशा देणारे उपक्रमही येथे राबवण्यात आले. यात प्रामुख्याने अध्यात्मिक चित्र प्रदर्शन, मूल्य आधारित खेळ आणि विज्ञानाचे मनोरंजक प्रयोग यांचा समावेश होता.

कार्यक्रमादरम्यान सादर करण्यात आलेल्या 'व्यसनमुक्ती' नाटकाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. व्यसनाधीनतेच्या गर्तेत अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी आध्यात्मिक बळाची गरज असल्याचे यातून अधोरेखित करण्यात आले. सकाळी झालेल्या महाआरतीमध्ये शेकडो भाविक मनोभावे सहभागी झाले होते.



त्रिया वसंतम सिटी सेंटर, कमल पार्क, लोहगाव-धानोरी रोड येथे हा महोत्सव उद्या, सोमवार १६ फेब्रुवारी रोजी देखील सकाळी ७ ते रात्री १० या वेळेत सुरू राहणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या कुटुंबासह या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## इंदिरा आयव्हीएफने हडपसर येथे नवीन फर्टिलिटी क्लिनिकचे केले उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडने ४१ सिटी हब, दुसरा मजला, श्री स्वामी समर्थ नगर, गाडीतळ, हडपसर, पुणे येथे आपल्या नवीन फर्टिलिटी क्लिनिकचे उद्घाटन पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर यांच्या हस्ते करणात आले त्यावेळी नगरसेवक योगेश मुळीक, इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुंकड, डॉ. इशिता लुंकड, हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर सह अन्य मान्यवर ही उपस्थित होते.



या नव्या केंद्राच्या सुरूवातीमुळे पुणे आणि परिसरातील नागरिकांना अधिक सुव्यवस्थित, सुरक्षित आणि सुलभ प्रजनन उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेसच्या सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज हे केंद्र रुग्णांना स्टॅण्डर्ड क्लिनिकल प्रोटोकॉल, पेशंट सेफ्टी सिस्टीम आणि तंत्रज्ञानाधारित उपचार पद्धतींच्या माध्यमातून पारदर्शक, सुरक्षित आणि स्थिर उपचार सेवा उपलब्ध करून देईल. मुख्य अतिथी पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर म्हणाल्या की ,स्थानिक स्तरावर हेल्थकेअर इन्फ्रास्ट्रक्चर बळकट करणे हा प्रदेशाच्या दीर्घकालीन आरोग्य गरजांचा विचार करता अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. हडपसरमधील इंदिरा आयव्हीएफची सुरुवात कुटुंबांना संघटित फर्टिलिटी केअर अधिक जवळ आणणारी आहे आणि रिप्रोडक्टिव्ह हेल्थमध्ये योग्य वेळी मिळणाऱ्या सल्ला सेवेच्या महत्त्वावर प्रकाश टाकते विशेष अतिथी नगरसेवक योगेश मुळीक म्हणाले,स्थानिक स्तरावर आरोग्य सेवांची उपलब्धता हा मजबूत समाज व सक्षम कुटुंबांचा पाया आहे. इंदिरा आयव्हीएफचे नवीन केंद्र फर्टिलिटी अवेअरनेस वाढवण्यासोबतच वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्यास योग्य प्रोत्साहन देईल. अशा उपक्रमांमुळे संपूर्ण आरोग्यव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होतो.

इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीज मुर्डिया म्हणाले, हडपसरमधील हा विस्तार फर्टिलिटी केअर अधिक सुलभ आणि विश्वासार्ह करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे. जागरूकता वाढत आहे आणि रुग्ण लवकरच्या टप्प्यातच संगठित मार्गदर्शन शोधत आहेत; अशावेळी अनुभवी वैद्यकीय टीमच्या साहाय्याने एव्हिडन्स बेस्ड उपचार देणे अत्यंत आवश्यक ठरते.

इंदिरा आयव्हीएफ हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर म्हणाल्या, आमचे ध्येय असे उपचार वातावरण निर्माण करणे आहे, जिथे वैद्यकीय उपचारासोबतच भावनिक आधारही मिळेल. फर्टिलिटी केअर हा केवळ विज्ञानाचा विषय नाही; यात आत्मीयता आणि सहानुभूती यांचीही तितकीच गरज असते. आमची टीम दोन्ही दृष्टीकोन समोर ठेवून कार्य करेल.

## रस्त्यावर बसवल्याप्रकरणी मानवी हक्क आयोगाकडे तक्रार

पुणे (दै. संध्या)

बुधवार पेठ परिसरात पुणे पोलिसांनी केलेल्या १० तासांच्या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान ग्राहकांना रस्त्यावर बसवून सार्वजनिकरीत्या अपमानित केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. याप्रकरणी तुषार देवीदास झेंडे पाटील यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार झालेल्या या कारवाईत काही अल्पवयीन मुलींची सुटका करण्यात आली. दोन बांगलादेशी महिलांना बेकायदेशीर वास्तव्याच्या संशयावरून ताब्यात घेण्यात आले, तर एका व्यक्तीकडून अमली पदार्थ जप्त करण्यात आले. संबंधित बाबींवर कायदेशीर कारवाई करणे योग्य असले तरी कारवाईदरम्यान उपस्थित ग्राहकांशी वागण्याची पद्धत अमानवी असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. झेंडे पाटील यांनी म्हटले आहे की, अनेक ग्राहकांना कोणताही गुन्हा तत्काळ दाखल नसताना तासनतास रस्त्यावर बसविण्यात आले. त्यांची सार्वजनिक ठिकाणी ओळख उघड होईल अशा पद्धतीने वागणूक दिल्याने त्यांच्या सन्मानाला धक्का बसला. ही वागणूक मानवी हक्कांचे उल्लंघन असल्याचा दावा त्यांनी तक्रारीत केला आहे. तक्रारदाराने आयोगाकडे या संपूर्ण कारवाईची चौकशी करण्याची मागणी केली आहे. पुणे पोलिस आयुक्तांकडून सविस्तर अहवाल मागवावा, ऑपरेशनदरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज, लॉगबुक आणि ताबा नोंदी तपासाव्यात, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत खामगाव येथे शेतकरी प्रशिक्षण संपन्न

**कृषी विभागाच्या मार्गदर्शनामुळे हरभरा उत्पादनात २५-३० टक्के वाढीचा शेतकऱ्यांचा विश्वास**

यवत (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या कृषी आयुक्तालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान' (NFSMN) अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षासाठी हरभरा पीक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दौंड तालुक्यातील खामगाव येथे करण्यात आले. या प्रशिक्षणाद्वारे परिसरातील शेतकऱ्यांना हरभऱ्याचे आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पीक व्यवस्थापनाचे सखोल धडे देण्यात आले.



या उपक्रमाला तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने, मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप आणि उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांनी वेळोवेळी भेट देऊन शेतकऱ्यांना मोलाचे तांत्रिक मार्गदर्शन केले. शासनाच्या योजना थेट बांधापर्यंत पोहोचवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

सदर प्रशिक्षण सत्रांमध्ये सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी रब्बी हंगामातील हरभरा पिक लागवडीपासून ते काढणीपर्यंत शेतकऱ्यांना एकूण चार प्रशिक्षण सत्रांमध्ये सखोल तांत्रिक मार्गदर्शन केले.

रिसोर्स फार्मर निवृत्ती अण्णा जगताप यांनी आपल्या अनुभवातून हरभऱ्याच्या आधुनिक प्रयोगांची माहिती देत शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

रोहिदास जगताप यांनी हरभरा लागवडीपासून ते काढणीपर्यंत कृषी विभागाचे सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन मिळत आहे. या योग्य नियोजनामुळे आणि आधुनिक पद्धतींचा अवलंब केल्यामुळे आमच्या हरभरा उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ नक्की होईल, असा आम्हाला विश्वास वाटतो असे सांगितले.